नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १३६ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




गुरुवार, दि. १६ एप्रिल २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...



### नारी शक्ती वंदन विधेयक भविष्य बदलेल

मुंबई (स. गांवकरी) : मोदी सरकारने आणलेले ‘नारी शक्ती वंदन’ विधेयक देशाच्या लोकशाहीला नवे वळण देणारी ‘वॉटरशेड मूव्हमेंट’ ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी व्यक्त केला. या आरक्षणामुळे २०२९ च्या लोकसभा निवडणुकीत महिला खासदारांची संख्या ३३ टक्क्यांवर मर्यादित न राहता, ती ४० टक्क्यांचा टप्पा ओलांडेल, असे प्रतिपादनही त्यांनी केले. दादर येथील योगी सभागृहात आयोजित ‘नारी शक्ती वंदन महिला संमेलना’त मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी व्यासपीठावर अभिनेत्री पद्मश्री रवीना टंडन, वैशाली सामंत, प्राजक्ता माळी, भाजप महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ, मुंबई भाजप अध्यक्ष अमित साटम, माजी महापौर रितू तावडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री म्हणाले की, "यापूर्वी दिवंगत पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी आणि मनमोहन सिंग यांच्या काळातही आरक्षणाचे प्रयत्न झाले. मात्र, तत्कालीन घटक पक्षांचा विरोध आणि अन्य कारणांमुळे हे विधेयक प्रलंबित राहिले.

### झाडांच्या फांद्यांची होणार छाटणी

मुंबई (स. गांवकरी) : धोकेदायक ठरू शकणाऱ्या झाडांची पावसाळा सुरू होण्यापूर्वी शास्त्रोक्त पद्धतीने छाटणी कशी करावी तसेच वृक्षगणना करत असताना अत्याधुनिक यंत्रसामुग्रीचा वापर कसा करावा, याबाबत महानगरपालिकेच्या उद्यान विभागाच्यावतीने प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. मात्र, हे प्रशिक्षण देण्यात आले असले तरी प्रत्यक्षात मुंबईतील झाडांच्या धोकादायक फांद्यांची शास्त्रोक्त छाटणी होईल का? तसेच धोकादायक झाडांची कापणी केली जाणार आहे का असा प्रश्न निर्माण होत आहे. झाडांच्या फांद्यांची शास्त्रोक्त छाटणीबाबत प्रशिक्षण देण्यात आले असले तरी पावसाळ्यात झाडांच्या फांद्या तुटण्याचे प्रमाण कमी झाले तरच या प्रशिक्षण शिबिराचा उपयोग होईल असे मानले जात आहे.

### दहावीचा निकाल ९२.८९ टक्के

मुंबई (स. गांवकरी) : महानगरपालिकेच्या शिक्षण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) संलग्न ११ शाळांच्या विद्यार्थ्यांनी इयत्ता दहावी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या परीक्षेत महानगरपालिकेच्या शाळांचा एकूण निकाल ९२.८९ टक्के इतका लागला असून, विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण प्रगती दर्शवली आहे. महानगरपालिकेच्या शिक्षण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) संलग्न ११ शाळांमधून एकूण ३३९ विद्यार्थ्यांनी इयत्ता दहावीची परीक्षा दिली होती. मिठागर सीबीएसई शाळेतील कुमारी आर्या लामने ह्या विद्यार्थीनीने ९७.८ टक्के गुण मिळवून महानगरपालिकेच्या शाळांतून प्रथम येण्याचा मान मिळविला. तसेच महानगरपालिकेच्या पुनम नगर शाळेतील सौरभ यादव (९७.२ टक्के), राजावाडी शाळेतील कौस्तुभ त्रिपाठी (९७ टक्के), पुनम नगर शाळेतील आर्यन मयेकर (९६.६ टक्के) आणि श्रेया सिंग (९६.४ टक्के), मिठा नगर शाळेतील माही सोळंकी (९६.२ टक्के) या विद्यार्थ्यांनी सर्वाधिक गुण मिळविले.

# वाट लावायची म्हणून खरात प्रकरण समोर

## पत्रकार काय भोगत असतो हे समजलं पाहिजे : राज ठाकरे यांचे परखड मत

मुंबई : (स. गांवकरी)

राज्यात नाशिकचा भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणावरुन सध्या राजकीय आरोप-प्रत्यारोप होत आहेत. एकीकडे ह्या प्रकरणात अशोक खरात वगळता इतर कोणालाही अटक नसल्याने विरोधकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. तसेच, खरातप्रकरणी राजकीय नेत्यांना एसआयटी चौकशीसाठी कधी बोलवणार असाही सवाल केला जात आहे. तर, हे प्रकरण तीन महिन्यांपूर्वीच गृह खात्याला माहिती होतं असे काँग्रेस नेते तथा माजी मंत्री सतेज पाटील यांनी म्हटलं आहे. आता, मनसेप्रमुख राज ठाकरे यांनीही खरातप्रकरणावर पहिल्यांदाच भाष्य केले असून परखडपणे आपलं मत मांडलं आहे.

पत्रकार काय भोगत असतो हे समजलं पाहिजे, आपल्याकडे भोगणे याला वेगळ्या अर्थाने बघितलं जातं. अरुण गुजराती यांच्यासोबत मी पहिल्यांदा बसलो, या महाराष्ट्राच्या मातीशी एकरूप होणारे गुजराती आम्हाला हवे. या महाराष्ट्राच्या जमिनीवर डोळा ठेवणारे नाही, असे म्हणत राज ठाकरे यांनी आपल्या भाषणातून नाव न घेता थेट काही उद्योगपतींवर निशाणा साधला. व्यंगचित्रासंदर्भातील कार्यक्रमात बोलताना राज ठाकरे म्हणाले, अनेक पत्रकार त्रास सहन करत आहेत, अनेक बंधन आहेत. मला आताच्या पत्रकार मुला मुलीचं वाईट वाटतं. कारण, ऑफिस म्हणत काहीतरी घेऊन या, काय घेऊन या? कांदे चालतील? नाही. मग काय हे असे बोलले ते तसे बोलले झुंजवा. मग, प्रकरण आई बहिणींपर्यंत जातं, असे म्हणत राज ठाकरेंनी बातम्यांबाबत मत मांडलं. कोणतरी आला खरात. शेताला पाणी मिळत नाही पण खरातला पाणी मिळत. ही प्रकरण पण कोणाची तरी वाट लावायची म्हणून ठेवलेली बाहेर काढतात, असे म्हणत राज ठाकरेंनी खरात प्रकरणावर पहिल्यांदाच आपली प्रतिक्रिया जाहीर कार्यक्रमातून दिली. तसेच, लोक सुधारतील अशी अपेक्षा आणि मला पुन्हा व्यंगचित्र काढायची संधी मिळेल, असेही राज यांनी यावेळी म्हटले. व्यंगचित्र काढून खूप प्रयत्न केले पण लोक काही सुधारले नाही, जे चित्रातून होत नाही ते आमच्या भाषणातून होतं. सध्या, राजकीय लोकांनी ट्रोलर बसवलेले असतात. माझी इच्छा होती वर्तमानपत्र काढायची पण बरं झालं मी नाही काढला. कारण, सध्या सगळी जाहिरातीवर चालतात आणि त्यासाठी काय काय करतात ते मला करावे लागलं असत, अशी मिश्कील टिपण्णी राज ठाकरे यांनी केली. पत्रकार माझ्या घरातच होते, मी बघत आलो. अत्रेंसारखी पत्रकारिता आज शक्य नाही, अत्रे हे एक व्यक्ती नव्हती. रावण विद्वान होता, 10 तोंड म्हणजे विद्वतेची दहा तोंडे होती. अत्रे पण रावणासारखे 10 तोंडांसारखे विद्वान. त्यांची अनेक अंग होती, मला खंत आहे की मी त्यांना पाहू शकलो नाही. आजच्या पत्रकारितेला अनेक पदर आहेत. ते पदर उघडले तर सगळे नागडे होतील. चांगल्या पत्रकारांचा हकनाक बळी जात आहे. मी नागपूरला गेलो होतो अधिवेशन कालावधीत, मला तेव्हा एकनाथ शिंदे यांचा फोन आला, बोलले या विधानभवनात. मी गेलो तिथं अनेक पत्रकार भेटले, मी त्यांना विचारलं की आता कुठे आहेस. असे अनेक पत्रकार मला भेटले की ते मंत्र्यांकडे कामाला आहेत. काय यांच्याकडून अपेक्षा करायची, जे स्वतः विकले आहेत त्यांच्या मतांना काय किंमत द्यायची. मी तर मेलेला कोंबडा आहे, ज्याला आगीची भीती नाही, असे म्हणत राज ठाकरेंनी पत्रकारांची व्यथाच मांडली.



### पत्रकारितेचे वास्तव

आजच्या पत्रकारितेवर भाष्य करताना राज ठाकरे यांनी अत्यंत खेद व्यक्त केला. ते म्हणाले, "मला आजच्या तरुण पत्रकार मुला-मुलींची कीव येते. ऑफिस त्यांना 'काहीतरी घेऊन या' सांगतं. आता काय घेऊन यावं? कोणाचे तरी कपडे फाडल्याशिवाय बातमी होत नाही. आजच्या पत्रकारितेचे अनेक पदर आहेत, ते उघडले तर सगळे 'नागडे' होतील. अनेक पत्रकार आता मंत्र्यांकडे कामाला आहेत. जे स्वतः विकले गेले आहेत, त्यांच्या मतांना काय किंमत द्यायची?"

# महाराष्ट्र उष्णतेने होरपळला

## *देगलूरच्या सुंदगीत देशातील उच्चांकी ४७ अंश तापमानाची नोंद; अकोल्याचा पारा ४४.२ अंशांवर*

मुंबई : (स. गांवकरी)



राज्यात उन्हाचा कडाका आता दिवसेंदिवस वाढताना दिसत असून, अनेक जिल्ह्यांमध्ये तापमानाने चाळीशी पार केली आहे. विशेषतः नांदेड जिल्ह्यातील देगलूर तालुक्यातील सुंदगी गावात आज चक्क ४७ अंश सेल्सिअस इतक्या विक्रमी तापमानाची नोंद झाली. या तापमानासह सुंदगी हे आज देशातील सर्वाधिक उष्ण शहर ठरले आहे. दुसरीकडे, विदर्भातील अकोला आणि अमरावतीतही सूर्याने आग ओकायला सुरुवात केली असून जनजीवनावर परिणाम पाहायला मिळत आहे. अकोला जिल्ह्यात तापमानाचे दररोज नवनवे रेकॉर्ड प्रस्थापित होत आहेत. आज अकोल्यात या मोसमातील सर्वाधिक ४४.२ अंश तापमानाची नोंद झाली. गेल्या सात दिवसांत येथील पारा ५.५ अंशांनी वधारला आहे. सलग तीन दिवसांपासून अकोल्याचे तापमान ४३.८, ४४ आणि आज ४४.२ असे वाढतच असल्याने दुपारी रस्त्यांवर जणू 'अघोषित संचारबंदी' असल्यासारखी परिस्थिती पाहायला मिळत आहे. दरम्यान, उष्माघातामुळे एका रिक्षा चालकाचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. या संदर्भातील माहिती येथील पोलिस अधिकाऱ्यांनी दिली आहे. केवळ अकोलाच नव्हे, तर संपूर्ण विदर्भात उष्णतेची लाट पसरली आहे. अमरावतीमध्येही आज ४४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

### आरोग्य विभागाचा सावधगिरीचा इशारा

वाढत्या उष्णतेमुळे दुपारी बाजारपेठा आणि रस्त्यांवर शुकशुकाट पाहायला मिळत आहे. पुढील काही दिवस तापमानाचा हा चढता आलेख कायम राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर धुळ्याचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. रवी सोनवणे यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, अत्यंत आवश्यक काम असेल तरच घराबाहेर पडावे. बाहेर पडताना टोपी, रुमाल आणि गॉगलचा वापर करावा. उष्माघाताची लक्षणे जाणवल्यास तातडीने जिल्हा रुग्णालयातील विशेष 'उष्माघात कक्षात' उपचार घ्यावेत.

# माणसे बदलल्याने पक्ष मजबूत होणार नाही : रावसाहेब दानवे

मुंबई : (स. गांवकरी)

शिवसेना ठाकरे गटात पक्षांतर्गत फेरबदलांच्या हालचाली सुरू असून, युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या खांद्यावर लवकरच 'कार्याध्यक्ष' पदाची धुरा सोपवण्यात येणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. मात्र, या संभाव्य नेतृत्व बदलावर भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी जोरदार टीका केली आहे. "केवळ माणसं बदलून पक्ष वाढत नसतो, तुम्ही विचारांना मुठमाती दिली म्हणूनच तुमच्यावर ही 'मरणअवकळा' आली आहे," अशा बोचऱ्या शब्दांत दानवे यांनी आदित्य ठाकरेंना लक्ष्य केले. गत काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणात वेगवान घडामोडी घडत आहेत. त्यातच जून महिन्यात होणाऱ्या ठाकरे गटाच्या कार्यकारिणीच्या बैठकीत उद्धव ठाकरे यांचे सुपुत्र आदित्य ठाकरे यांच्या



खांद्यावर मोठी जबाबदारी टाकली जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी राज्याच्या राजकारणात संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. या पार्श्वभूमीवर रावसाहेब दानवे यांनी प्रतिक्रिया देत शिवसेना ठाकरे गटावर टीका केली आहे३ आदित्य ठाकरे यांनी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये केलेल्या कामाची दखल घेत त्यांना मोठी जबाबदारी दिली जाणार असल्याचे बोलले जात आहे.

# अमरावती लैंगिक शोषणप्रकरणी कारवाई

## १८० मुलींना प्रेमाच्या जाळ्यात ओढणाऱ्या अयाज तनवीरच्या घरावर बुलडोझर, सरकारकडून SIT दाखल

अमरावती : (स. गांवकरी)

परतवाडा शहरात तरुणींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून लैंगिक शोषण आणि त्यानंतर ब्लॅकमेल केल्याच्या गंभीर प्रकरणात पोलिसांनी मोठी कारवाई करत आतापर्यंत चार आरोपींना अटक केली आहे. या प्रकरणात सुरुवातीला मोहम्मद अयाज मोहम्मद तनवीर याला अटक करण्यात आली होती. त्यानंतर तपासादरम्यान मिळालेल्या माहितीच्या आधारे उजेर खान इकबाल खान, तरबेज खान तस्लिम खान आणि मोहम्मद साद मोहम्मद सादिक या तिघांनाही पोलिसांनी बेड्या ठोकल्या.

या प्रकरणात व्हिडिओ व्हायरल केल्याच्या धक्कादायक प्रकरणात आता प्रशासनानेही कडक पावले उचलण्याची तयारी सुरू केली आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी मोहम्मद अयाज मोहम्मद तन्वीर याच्या घरावर कारवाई सुरू झाली आहे. अचलपूर नगरपरिषदेकडून संबंधित



घरावरील अतिक्रमणाबाबत तपास केला असून, काही भाग बेकायदेशीररित्या बांधण्यात आल्याचे समोर आले होते. त्यानंतर नगरपरिषदेने आरोपीच्या कुटुंबाला अतिक्रमणासंदर्भात नोटीस बजावल्याची माहिती समोर आली होती. त्यानुसार आज बुलडोझरद्वारे कारवाई करण्यात आली. दरम्यान, या कारवाईच्या पार्श्वभूमीवर आरोपीच्या घराजवळ पोलिसांचा कडक बंदोबस्त ठेवण्यात आला आहे, जेणेकरून कोणताही अनुचित प्रकार घडू नये.

दुसरीकडे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. प्रकरणाचा तपास करण्यासाठी सरकारकडून एसआयटीची स्थापना करण्यात आली आहे. या प्रकरणात भाजपचे खासदार अनिल बोंडे यांनी गंभीर आरोप करत संबंधित आरोपीने 180 तरुणींचे शोषण केले आणि सुमारे 350 अश्लील व्हिडिओ तयार करून व्हायरल केल्याचा दावा केला आहे. या आरोपांनंतर पोलिसांनी तपास अधिक वेगाने सुरू केला. आरोपींनी प्रेमाच्या बहाण्याने मुलींना जाळ्यात ओढून त्यांच्यावर अत्याचार केल्याचे समोर येत असून, हा प्रकार गेल्या वर्षभरापासून सुरू असल्याची माहिती पुढे आली आहे.

तपासादरम्यान आरोपींच्या मोबाईल मधून मोठ्या प्रमाणात अश्लील व्हिडिओ आढळल्याची माहिती मिळत आहे. हे व्हिडिओ इतर साथीदारांना पाठवले गेले का, याचा शोध घेतला जात आहे. काही व्हिडिओ सोशल मीडियावर आधीच व्हायरल झाल्याचेही समोर आले आहे. पुरावे नष्ट करण्याच्या प्रयत्नात आरोपींनी मोबाईलमधील डेटा डिलीट केला असला, तरी सायबर तज्ज्ञांच्या मदतीने तो पुन्हा मिळवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

# चाकणकरांची नेत्यांना व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी

## रुपाली ठोंबरे पाटील यांच्या दाव्याने खळबळ; पोलिसांवर अटक न करण्याचा आरोप

पुणे : (स. गांवकरी)

राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी अनेक नेत्यांना व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी दिल्याचा आरोप सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली पाटील ठोंबरे यांनी केला आहे. त्यांच्या या आरोपामुळे भोंदू अशोक खरात प्रकरणातील नवे कंगोरे समोर येण्याची शक्यता वाढली आहे. गत काही दिवसांपासून भोंदू अशोक खरात प्रकरणाने राज्याचे रान पेटले आहे. या प्रकरणी दररोज नवनवे खुलासे होत आहेत. या पार्श्वभूमीवर रुपाली ठोंबरे यांनी रुपाली चाकणकर यांच्यावर नेत्यांना धमकी दिल्याचा आरोप केला आहे. त्या म्हणाल्या, रुपाली चाकणकर दहावी नापास कोंबडी चोराच्या भोंदू बाबाच्या ट्रस्टवर आहेत. त्यांच्या माध्यमातून महिलांवर लैंगिक अत्याचार झाले. त्यामुळे त्यांना अटक झाली पाहिजे. पण त्यांना अजून का अटक झाली नाही? चाकणकर यांनी ज्या लोकांना भोंदू खरातकडे पुजेला नेले, तेच लोक त्यांना या प्रकरणात वाचवत आहेत. पुजेला गेल्यानंतर स्वतःच्या करंगळ्या कापणाऱ्या



नेत्यांना चाकणकर त्यांचे व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत आहेत. त्यामुळे ते त्यांना वाचवत आहेत. रुपाली ठोंबरे म्हणाल्या, रुपाली चाकणकर यांना कायदा कळत नाही. संविधान कळत नाही. कसे वागावे हे ही कळत नाही. त्यांना महिला आयोगाचे पावित्र्य व प्रतिष्ठाही कळली नाही. त्यामुळे त्या 28 दिवसांनी बोलल्या काय? किवा 280 दिवसांनी बोलल्या काय? त्याने काहीही फरक पडत नाही. त्यांच्याकडे बोलण्यासारखे काहीच नाही. रुपाली चाकणकरांनी पुरावे देऊन बोलावे. पोलिस चाकणकर व त्यांच्या कुटुंबीयांना वाचवत आहेत. अखेरीस त्यांच्या टोळीमध्ये ज्या कुणी महिला आहेत, त्या सर्वांवरही कारवाई करण्यात यावी अशी आमची मागणी आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे रुपाली चाकणकर यांनी मंगळवारी एका पोस्टद्वारे भोंदू अशोक खरात प्रकरणात आपल्यावर झालेले आरोप फेटाळून लावले होते. त्या म्हणाल्या होत्या, महाराष्ट्राच्या राजकीय क्षेत्रात आजतागायत अनेकांवर आरोप झाले,त्या आरोपांचे पुरावे माध्यमांनी सबंध महाराष्ट्राला दाखवले व आरोप करणाऱ्यांनीही पुराव्यानिशी आरोप केले.मात्र आज 28 दिवस होत आहेत, माझ्यावर व माझ्या परिवारावर बेछूट व कपोलकल्पित आरोप हे फक्त हेतूपुरस्सर व बदनाम करण्यासाठी होत आहेत, हे वेळोवेळी समोर येत आहे.याबाबतीत आरोप करणाऱ्यांनी ना पुरावे दिले ना प्रसार माध्यमांनी ते मागितले. तसेच, निनावी पत्राबाबत जे कोणी आरोप करणारे आहेत त्यांनी सांगावे की ते पत्र त्यांच्यापर्यंत कसे आले? कोणतीही शहानिशा न करता केवळ आणि केवळ बदनामीचा कुटील डाव साध्य करण्यासाठी, पोलीस प्रशासनाला प्राप्त झालेलं एक निनावी पत्र माध्यमांकडे सुपूर्त करून दिवसभर चर्चासत्र घडवून आणले गेले ,हे घडवून आणण्यामागे कुणाचे “सौजन्य “होते हे समोर आले पाहिजे.

# 'एकनाथ शिंदे आले आणि म्हणाले एके ठिकाणी जायचेय..':

नाशिक (स. गांवकरी)

नाशिकमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलताना राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी भोंदू अशोक खरात भेटीबाबत महत्त्वपूर्ण स्पष्टीकरण दिले असून, हा सर्व प्रकार केवळ अज्ञानातून आणि दीपक केसरकर यांच्या आग्रहामुळे घडल्याचे त्यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे जेव्हा शिर्डीला आले होते, तेव्हा त्यांना खरातच्या पार्श्वभूमीबद्दल कोणतीही कल्पना नव्हती, असे विखे पाटलांनी सांगितले आहे.



■ मंत्री राधाकृष्ण विखे पाटलांनी सांगितला खरातच्या भेटी मागचा किस्सा

राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले की, एकनाथ शिंदे एके दिवशी आले. ते मला म्हणाले की एके ठिकाणी जायचे आहे. अशोक खरातबाबत माहिती असती तर ते तिकडे गेले असते का? असा सवाल विखे पाटलांनी उपस्थित केला. नाशिकमध्ये ते प्रसार माध्यमांशी बोलत होते. राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, अशोक खरात प्रकरणात आम्ही पहिला गुन्हा दाखल केला म्हणून हे प्रकरण उघडकीस आले. अनेक महिला अशोक खरातच्या वलयाला बळी पडल्या. अंजली दमानिया यांनी जे आरोप केले आहेत, त्याबाबतचे सत्य चौकशीत समोर येईल. अनेकांचे पाय धुताना फोटो आहेत, भाषण करताना नावे आलेली आहेत. आपल्या भागातील माणूस देवाचा अवतार आहे, असे समजून शिर्डीतील काही लोक बळी पडले. पण यासाठी लोकांना दोष देऊ नये. पुढे बोलताना राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, समता पतसंस्था प्रकरणात जबाब नोंदवले गेले आहेत. अशोक खरात स्वतः अकाउंट उघडायचा आणि ऑपरेट करायचा. अनेक महिलांना फसवण्यात आले. अज्ञानाने घडलेल्या गोष्टी आणि माहिती असून जाणे, यामध्ये फरक आहे. इथून पुढे कोणी भविष्य सांगायला आले, तर आधी त्याचे भविष्य बघावे लागेल. अंजली दमानिया यांच्याकडे भरपूर माहिती असेल. रोज नवीन प्रकार समोर येत आहेत. जे दोषी असतील, ते मोठ्या पदावर असतील तरी कारवाई झाली पाहिजे, असेही विखे पाटील म्हणाले.

## थोडक्यात पण महत्वाचे




### उमेदचे स्वयंरोजागार व मार्गदर्शन मेळावा उत्साहात साजरा

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील पारगाव तर्फे मढ येथे उमेद महाराष्ट्रराज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत जुन्नर पंचायत समिती व ग्रामपंचायत पारगाव तर्फे मढ येथे नवचेतना ग्राम संघाची वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी उमेद अभियानातील सर्व महिलांनी उपस्थिती दर्शवून अभियान समजून घेऊन,शाश्वत उपजीविका निर्माण,महिला सक्षमीकरण व गावाचा सर्वांगीण विकास या विषयांवर चर्चा केली. गावचे ग्राम विकास अधिकारी विठ्ठल भोईर यांनी महिलांना मार्गदर्शन केले.त्यासोबतच सरपंच व पंचायत समिती सदस्या आशाताई डावखर यांनी देखील महिलांच्या समस्या समजून घेऊन,ग्रामीण रोजगार संधींची माहिती देत गटाचे व्यवस्थापन,व्यवहार जबाबदारी पूर्वक पार पडण्याच्या सूचना दिल्या.ग्राम सखी.CSR समुह संस्था नवचेतना ग्रामसंघाच्या पदाधिकाऱ्यांनी लेखा जोखा वाचन करून झालेला फायदा तसेच प्रत्येक गरजू महिलेची समस्या लक्षात घेऊन कर्ज उपलब्ध करून देण्यात येईल अशी माहिती दिली. सभा अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडून सर्व महिलांना योग्य मार्गदर्शन व त्यांच्या प्रश्नांचे निराकरण करण्यात आले.या वेळी उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत मांडले,महीलांनी त्यांना येणाऱ्या अडचणी व पुढील येणाऱ्या काळात कशा पध्दतीने रोजगार व स्वयंरोजगार करणार आहे याचे मनोगत मांडले ग्राम संघाच्या सुनिताताई बगाड लेखापाल यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानत कार्यक्रमाची सांगता केली.

### डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर




नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : सध्या जाणवत असलेल्या रक्तदान शिबिराची टंचाई व उन्हाच्या पारा ४३° सें एवढा चढलेला असुन सूद्धा दिनांक:- १४/०४/२०२६ रोज मंगळवार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ जयंतीनिमित्त रेल्वे स्टेशन रोड येथील अर्पण रक्तकेन्द्रतर्फे आयोजित रक्तदान शिबिरात महिलांनीही सहभाग घेतला व या शिबिरात एकूण १३५ रक्तदात्यानी रक्तदान करून महामानवास कृतीशील अभिवादन केले, या शिबिरास रक्तदान शिबिरास महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा तत्कालीन भाजपा राज्यसभा सदस्य मा. अशोकराव चव्हाण साहेब, भोकर विधानसभा सदस्या श्रीजया चव्हाण, विधान परिषद सदस्य अमरभाऊ राजूरकर, उत्तरचे आमदार बालाजी कल्याणकर, दक्षिण नांदेडचे आमदार आनंद बोढारकर, कंधार लोहा मतदारसंघांचे आमदार प्रताप पाटील चिखलीकर, वंचित बहुज आघाडीचे फारुख अहमद, नगरसेवक प्रशांतदादा इंगोले, विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप साहेब, पोलीस अधीक्षक मा. अविनाश कुमार साहेबसह अन्य वरिष्ठ अधिकारी तथा नेत्यांनी उपस्थिती दर्शवली, या शिबिरास अर्पण रक्तकेंद्राचे संचालक व मनसे जिल्हाध्यक्ष मा. मॉन्टीसिंग जहागीरदार, संचालक श्री सुदर्शन अदमनकर सर, संचालक कृष्णा भुसेवाड सर व सर्व प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांनी अथक परिश्रम घेतले व सर्व रक्तदात्यास डॉ. आंबेडकर यांचे छायाचित्र व सन्मानपत्र देवुन सन्मानित करण्यात आले.



### दिव्यात एच पी गॅसच्या श्रद्धा गॅस एजन्सी कडून ग्राहकांची फसवणूक

ठाणे (स. गांवकरी) : अमेरिका - इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर अनेक ठिकाणी घरगुती गॅस सिलेंडरचा तुटवडा भासत असताना दिवा शहरात मात्र कृत्रिम रित्या सिलेंडरचा तुटवडा निर्माण करून काळया बाजारात सिलेंडर विकले जात असल्याचा संशय निर्माण होत आहे. दिव्यात एच पी गॅस कंपनीचा पुरवठा करणाऱ्या श्रद्धा गॅस एजन्सी मध्ये ग्राहकांनी सिलेंडरसाठी आगाऊ बुकिंग करून देखील त्यांना सिलेंडर दिले जात नाही. विशेष म्हणजे सिलेंडर बुक केल्यानंतर सिलेंडर डिलिव्हरी झाल्याचे ओटीपी मिळून देखील २५ ते ३० दिवस होऊनही सिलेंडर अद्याप मिळालेले नाहीत. याबाबत श्रद्धा गॅस एजन्सी मध्ये ग्राहकांनी संपर्क करण्यासाठी प्रयत्न केला असता एजन्सीने आपले दिवा आणि डोंबिवली मधील सर्व कार्यालये बंद ठेवली असून ते कोणीही संपर्क करण्याचा प्रयत्न केल्यास त्यांना उत्तरे देत नाहीत. याबाबत एच पी गॅस कंपनीच्या सेल्स ऑफिसर चित्रा नायर यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी कोणाचेच फोन उचलले नाहीत असे मनसेचे शहर सचिव प्रशांत गावडे यांनी सांगितले. संबंधित गॅस एजन्सी कडून नागरिकांची फसवणूक होत असून Essential Commodities Act नुसार संबंधित गॅस एजन्सी वर कारवाई करून गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी तहसीलदार यांची भेट घेऊन करणार असल्याचे दिवा मनसेकडून सांगण्यात आले आहे.



### जुन्नर तालुक्यातील धरणातील पाणी पातळी चिंताजनक

शिवनेरी (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील माणिकडोह व येडगाव धरणातील पाणी पातळी चिंताजनक झाली आहे . यामुळे आदिवासी भागातील शेतकऱ्यांचे जीवनमान घालवले आहे . येथील आदिवासी बांधवांना पाण्यासाठी तीन ते चार तास पायपीट करावी लागत आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण , शेतीतील सर्व पिक व चारा प्रश्न, तसेच दूध उत्पादित सर्व पदार्थांवर मोठा फटका बसला आहे जुन्नर तालुक्यात पाच मोठे धरण येडगाव, माणिकडोह, वडज , पिंपळगाव जोगे , चिल्हेवाडी , पाच छोटी धरण तळेरान , घाटघर फडकी बंधारा , उच्छिल रामजेवाडी भिवाडे, घंगाळदरे , तांबे , तसेच लघु धरण दोन देवळे व हडसर या धरणातील पाण्याची पातळी खोलवर गेल्यामुळे मोठे संकट या परिसरात उभे राहिले आहे. येथील धरण परिसरातील शेतकरी बांधवांचा पाण्याचा प्रश्न फार बिकट झाला आहे. येथील धरणाची पातळी खोलवर गेल्यामुळे माता भगिनी यांचा पाणी पिण्याचा प्रश्न व जनावरांचा पाण्यासाठी भर उन्हाळ्यात वण वण पायपीट दोन ते चार तास करावी लागत आहे .

# बिलोलीत कायद्याचा विसर की सत्तेची मस्ती?

- 'स्थायी समिती'विना नगरपरिषदेचा कारभार म्हणजे लोकशाहीची थट्टा
- जिल्हा सह आयुक्तांच्या आदेशाने यंत्रणा हादरली!
- तिजोरीवर लोकशाहीचं नियंत्रण कुणाचं? सय्यद रियाज यांच्या पत्रानंतर' गंगाधर ईरलोड यांचे कडक निर्देश




बिलोली : (स. गांवकरी)

महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ च्या नियमांना केराची टोपली दाखवत बिलोली नगरपरिषदेचा कारभार सध्या 'अंधेर नगरी' प्रमाणे सुरू असल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून नगरपरिषदेत अत्यंत महत्त्वाची असलेली 'स्थायी समिती' आणि इतर विषय समित्या जाणीवपूर्वक गठित केल्या नसल्याचा आरोप करत पत्रकार तथा समाजसेवक सय्यद रियाज यांनी पुकारलेल्या कायदेशीर लढ्याला आता मोठे यश मिळाले आहे. नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा सह आयुक्त (नगरपालिका प्रशासन) गंगाधर ईरलोड यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत मुख्याधिकाऱ्यांना कडक शब्दांत प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले आहेत नगरपरिषदेचा कोणताही आर्थिक किंवा धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी 'स्थायी समिती'ची मंजुरी अनिवार्य असते. मात्र, बिलोली नगरपरिषदेत सत्ताधाऱ्यांच्या साठमारीमुळे आणि प्रशासनाच्या उदासीनतेमुळे या समित्यांची निवड टाळली जात आहे. २१ जानेवारी २०२६ रोजी बोलावलेली विशेष सभा केवळ नगरसेवकांच्या अनुपस्थितीमुळे 'व्यपगत' झाली होती. त्यानंतर प्रशासनाने हात जोडून बसणे पसंत केले, ज्यामुळे शहराच्या तिजोरीवर कोणाचेही कायदेशीर नियंत्रण उरले नाही.

सय्यद रियाज यांनी ७ एप्रिल २०२६ रोजी दिलेल्या निर्वाणीच्या इशारा पत्राची दखल घेत, जिल्हा सह आयुक्त गंगाधर ईरलोड यांनी ९ एप्रिल रोजी अधिकृत पत्र निर्गमित केले आहे. या पत्रात त्यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे की, नगरपरिषदेच्या सभागृहाची मान्यता घेऊन नियमानुसार पुढील कार्यवाहीसाठी तात्काळ प्रस्ताव सादर करावा. प्रशासनाच्या या पत्रामुळे आता बिलोली नगरपरिषद प्रशासनाची मोठी धावपळ उडाली आहे.

स्थायी आणि विषय समित्या नसल्यामुळे पाणीपुरवठा, आरोग्य आणि शिक्षण यांसारख्या अत्यावश्यक सेवांचा प्रश्न गंभीर झाला आहे. "समित्या नसणे हा केवळ योगायोग नसून, जनतेच्या पैशांची विनाअडथळा उधळपट्टी करण्यासाठी रचलेला हा कट आहे," असा घणाघाती आरोप सय्यद रियाज यांनी केला आहे.

जिल्हाधिकाऱ्यांच्या पत्रानंतर आता चेंडू मुख्याधिकाऱ्यांच्या कोर्टात आहे. जर येत्या काही दिवसांत विशेष सभा बोलावून स्थायी समितीची निवड केली नाही, तर बिलोलीत तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा सय्यद रियाज यांनी दिला आहे. यामुळे आता प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

> "प्रशासनाने आता कागदी घोडे नाचवणे थांबवून कायद्याची अंमलबजावणी करावी. स्थायी समितीशिवाय होणारा प्रत्येक रुपयाचा खर्च हा जनतेच्या पैशांची लूट आहे आणि आम्ही त्याचा जाब विचारल्याशिवाय राहणार नाही!"
>
> — सय्यद रियाज (समाजसेवक, बिलोली)

## पिरामल फायनान्स लिमिटेडचा महाराष्ट्रात विस्तार

मुंबई : (स. गांवकरी)

पिरामल फायनान्स लिमिटेड या रिटेल क्षेत्रावर लक्ष केंद्रित करणाऱ्या अग्रगण्य एनबीएफसी कंपनीने आपल्या प्रगतीत महत्त्वाचा टप्पा गाठत, एकूण व्यवस्थापनाखालील मालमत्तेत (एयूएम) 1 लाख कोटींचा आकडा पार केल्याची घोषणा केली आहे. हा टप्पा भारतातील प्रादेशिक आणि अर्ध-शहरी भागांमध्ये, विशेषतः महाराष्ट्रात, कंपनीची मजबूत वाढ आणि चांगली कामगिरी दर्शवतो. महाराष्ट्र हे पिरामल फायनान्स लिमिटेडसाठी सर्वात मोठ्या बाजारपेठांपैकी एक आहे. नाशिक, नागपूर, पुणे, ठाणे आणि कोल्हापूर यांसारख्या प्रमुख शहरांमध्ये कंपनीच्या 77 शाखा असून, मजबूत कर्ज व्यवसाय उभा राहिला आहे. राज्यात गृहकर्ज आणि व्यवसाय कर्जासाठी मागणी वाढत असून, नव्याने विकसित होत असलेल्या शहरांमुळे आणि छोट्या गावांमुळे या वाढीस चालना मिळत आहे. गेल्या चार वर्षांत



पिरामल फायनान्सने आपले नेटवर्क मोठ्या प्रमाणात वाढवले आहे. आर्थिक वर्ष 2021 मध्ये 20 पेक्षा कमी शाखा असलेल्या कंपनीच्या आता 26 राज्यांतील 460 शहरांमध्ये 650 पेक्षा जास्त शाखा कार्यरत आहेत. ही वाढ मुख्यतः टियर 2 आणि टियर 3 शहरांमध्ये, तसेच महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये विस्तार केल्यामुळे झाली आहे. पुढील काही वर्षांत देशभरात 1,000 ठिकाणी विस्तार करण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे, ज्यामध्ये प्रादेशिक बाजारपेठांवर विशेष लक्ष दिले जाणार आहे.

## दिव्यांगांना निधी मिळण्यासाठी राधेश्यामच्यावतीने निवेदन

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)



जुन्नर नगर पालिकेच्या वतीने जुन्नर शहरातील दिव्यांग लोकांना दर वर्षी प्रमाणे सन २०२५ चा पाच टक्के दिव्यांग निधी मिळावा म्हणून श्री राधे- श्याम दिव्यांग सशक्तीकरण केंद्र महाराष्ट्र राज्य ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष दिपक चव्हाण व अरुण शेरकर अध्यक्ष यांच्या मार्गदर्शना खाली जुन्नर नगर पालिकेचे मुख्याधिकारी चरण कोल्हे यांची समक्ष भेट घेऊन संघटनेचे निवेदन दिले. निवेदनात जुन्नर नगर पालिकेच्या वतीने दिव्यांग लोकांचा सन २०२१ ते२० २५ पर्यंत चा पाच टक्के निधी जमा खर्च लेखी मिळणे,मुकबधीर अतित्रिव्य दिव्यांग लोकांना व्यवसाय सुरू करण्यासाठी जुन्नर नगर पालिकेच्या हद्दीत २०० स्केअर फुट जागा मिळणे

दिव्यांग पाच टक्के दर वर्षी ६००० रुपये मिळतात त्यामध्ये पाच टक्के निधी मध्ये वाढकरुन दिव्यांगाच्या बँक खात्यात जमा करण्यात यावा दिव्यांग लोकांना मिटिंग कार्यक्रम व प्रक्षिशण करीता शहरात दिव्यांग भवन मिळावे दिव्यांग लोकांना घरकुल व जागा मिळणे दिव्यांग मेळाव्याचे आयोजन करण्यात यावे असे अनेक महत्वाचे विषया वर सविस्तर चर्चा करण्यात आली या वेळी मुख्याधिकारी चरण कोल्हे माहिती दिली की शहरातील दिव्यांग लोकांना लवकरात लवकर पाच टक्के निधी मध्ये वाढ करून दिव्यांग मेळाव्याचे आयोजन करून वाटप केले जाईल यावेळी नगर पालिकेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा,उपनगराध्यक्षा नगर सेवक यांच्या उपस्थित कार्यक्रम घेऊन दिव्यांगांचे अडचणी सोडवण्यात येतील व दिव्यांग लोकांना विमा व अरोग्यकार्ड याची नोंदणी करुन लाभ दिला जाईल असे आश्वासन संघटनेचे पदाधिकारी व दिव्यांग लोकांना दिले

यावेळी जुन्नर नगर पालिकेचे दिव्यांग कक्ष अधिकारी प्रणाली अंकुश,नगरपालिकेचे अधिकारी वर्ग व श्री राधेश्याम संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दिपक चव्हाण,अरुण शेरकर अध्यक्ष , सुनील जंगम,गोरक्षनाथ नरवीर , विलास डाके,स्वप्नील लांडे, प्रताप मालेगावकर,राजु मोमीन व दिव्यांग बांधव उपस्थित होते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

बिलोली : (स. गांवकरी)

बिलोली शहरात विश्वरत्न भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त दि. १४ एप्रिल रोजी शहरात विविध ठिकाणी आभिवादन सोहळा परपडला आणि आंबेडकरनगर, देशमुखनगर व नवीन बस्थानक शेजारी असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे पंचशील ध्वजाचा ध्वजारोहण करून सायंकाळी बाबासाहेबांच्या तैल चित्राची उत्साहात मिरवणूक काढण्यात आली आहे.

शहरात दरवर्षी प्रमाणे याही वर्षी विश्वरत्न भारतीय संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त शहरात विविध ठिकाणी बाबासाहेबांना अभिवादन करण्यात आले. तसेच आंबेडकरनगर, देशमुनगर व नवीन बस्थानक लगत असलेल्या आंबेडकर पुतळा येथे अनेक मान्यवराच्या उपस्थित पंचशील ध्वजाचे ध्वजारोहन करण्यात आले



यावेळी बिलोली नपचे नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी,माजी नगराध्यक्ष भीमराव जेठे,उपनगराध्यक्ष, अनुप अंकुशकर, तहसीलदार गजानन शिंदे, पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती. तत्पूर्वी

विविध पक्षांचे पदाधिकारी आणि सामाजिक कार्यकर्ते अॅड. भरत पवार, अभिजित तुडमे, इंद्रजित तुडमे , सय्यद रियाज , दिलीप उत्तरवाड, राजु गादगे , भास्करराव देवके, वैभव खांडेकर,अमजद चाऊस,वलीओद्दीन फारुखी, मिलिंद मांजरमकर,लक्ष्मण शेट्टीवार ,देवन्ना तंदरोड , सुनील फालके ,साईनाथ शिरोळे,पाशा भाई गादीवाले, संग्राम जेठे , प्रविण सोनकांबळे, संतोष अंकुशकर , मिलिंद पटाईतसह अनेक मान्यवरांच्या वतीने बाबासाहेबांच्या पुतळ्या पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तद्नंतर जयंती सोहळा पारपडला यावेळी अनेक नगरसेवक व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थित होती. तद्नंतर सायंकाळीच्या दरम्यान आंबेडकर नगर येथून ते बिलोली शहरात मोठ्या उत्साहात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्राची भव्य मिरवणूक काढण्यात आली होती ही मिरवणूक शांतिमय वातावरणात पारपडली आहे,हे सोहळा यशस्वी करण्यासाठी माजी नगरसेवक प्रकाश पोवाडे, पत्रकार रत्नाकर जाधव, संजय जाधव, धम्मपाल जाधवसह जयंती मंडळाच्या आदी पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतला आहे.यावेळी बिलोली पोस्टेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली चोक बंदोबस्त लावण्यात आला होता.

शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शेजारी, असलेल्या साहित्यरत्न लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्याच्या नियोजित जाग्यावर आण्णा भाऊ साठे यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणीसाठी नपचा ठराव मंजूर झाला असून या ठिकाणी येत्या १ ऑगस्ट पर्यंत पुतळा उभारण्यात येणार असल्याचे नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी यांनी जाहीर केलं आहे. त्याबरोबर नियोजित जगायचं दि १४ एप्रिल रोजी अनेक मान्यवरांच्या हस्ते भूमीपूजनही करण्यात आले.

## महापौर मंजुषा नागपुरे भीमगीतांच्या तालावर रंगल्या

पुणे : (स. गांवकरी)

विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती, पुणे तसेच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ.) छत्रपती शिवाजीनगर मतदारसंघ यांच्या संयुक्त विद्यमाने बोपोडी येथे भव्य जयंती महोत्सवाचे दिमाखदार आयोजन करण्यात आले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या करण्यात आलेल्या या सोहळ्यात आकर्षक विद्युत रोषणाई, दमदार स्पीकर शो आणि भीमगीतांनी परिसर भारावून गेला. या उत्साहपूर्ण वातावरणात पुण्याच्या प्रथम नागरिक महापौर मंजुषा नागपुरे यांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवत भीमगीतांच्या तालावर ठेका धरला. त्यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला विशेष रंगत प्राप्त झाली आणि नागरिकांमध्ये आनंदाची लहर पसरली. या वेळी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री



चंद्रकांत पाटील, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, डॉ. विजय खरे, अविनाश कदम, कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक व उपमहापौर परशुराम वाडेकर तसेच माजी उपमहापौर सुनीता वाडेकर आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान मान्यवरांनी क्रेनच्या सहाय्याने तब्बल ३० फूट उंचीवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी उपस्थितांनी 'जय भीम'च्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

# भोंदू अशोक खरात प्रकरणात ३ कोटींचा व्यवहार

## नगर जिल्ह्यातील शेवगावच्या चौघांचा समावेश

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

भोंदू अशोक खरातचे काळे साम्राज्य उभारण्यात अनेक उद्योजक, राजकीय नेत्यांचेही आर्थिक बळ मिळाल्याचा संशय पोलिसांना आहे. शिर्डीत चार एकर जमीन व्यवहारापूर्वी खरातच्या नाशिकमधील दोन बँक खात्यात नगर, नाशिकच्या सहा जणांनी सुमारे ३ कोटींपेक्षा अधिक रक्कम आरटीजीएसने टाकल्याचे समोर आले आहे.

धक्कादायक म्हणजे यात नगर जिल्ह्यातील शेवगावच्या चौघांचा समावेश आहे. नाशिकच्या दाम्पत्यासह शेवगावच्या चौघांना पोलिसांनी बुधवारी चौकशीसाठी पाचारण केल्याचे सूत्रांनी सांगितले.

भोंदू खरात, त्याची पत्नी कल्पनाची नाशिक आणि सिन्नर येथील बँक ऑफ बडोदा आणि युनियन बँक या दोन राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये खाती आहेत. त्यात मागील दोन वर्षांत २१ कोटींपेक्षा अधिक व्यवहार झाले आहेत. शिर्डीतील रावसाहेब गोंदकर यांच्या चार एकर जमिनीची पाच कोटींना खरेदी करण्यात आली होती. अशोक खरातने गोंदकर यांना ही रक्कम वेगवेगळ्या तारखांना वर्ग केली होती. मात्र, रावसाहेब गोंदकर याने फसवणूक झाल्याची



फिर्याद दिल्यानंतर शिर्डी पोलिसांनी अशोक खरात, त्याची पत्नी कल्पना खरात, यासह अरविंद बावके, किरण सोनवणे आणि अशोक तांबे यांच्याविरोधात सावकारकी आणि फसवणुकीचा गुन्हा दाखल केला होता. दरम्यान, अशोक खरात याच्या बँक खात्यांची चौकशी सुरू असताना समता पतसंस्थेतील १०० बनावट खात्यांवरील ६० कोटींचा गैरव्यवहार शिर्डी पोलिसांच्या तपासात पुढे आला.

याशिवाय, शिर्डीतील जमीन खरेदी करण्यापूर्वी काही दिवस अगोदर अशोक खरात याच्या नाशिक आणि सिन्नर येथील दोन बँकांमध्ये तीन कोटींपेक्षा अधिक रक्कम जमा झाली होती, हेही तपासात निदर्शनास आले.

अहिल्यानगरचे एसपी सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनात अपर पोलिस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. अशोक खरातच्या बँक खात्यात पैसे कोणी पाठविले, याची माहिती संकलित केली गेली. ट्रान्झॅक्शन आयडीवरून 'त्या' लोकांना डिटेक्ट करण्यात आले.

यामध्ये नाशिक येथील एका दाम्पत्यासह नगर जिल्ह्यातील शेवगावच्या चौघांचा समावेश असल्याचे प्रथमदर्शनी समोर आल्याचे समजते. शिर्डी पोलिसांनी संबंधित सहा जणांना समन्स पाठवून चौकशीसाठी बोलावले आहे.नुकतेच काल (बुधवारी) हे सहा जण हजर होणार असून, त्यांनी कोणत्या कारणासाठी खरातच्या बँक खात्यात हे पैसे पाठवले, याचे रहस्य उलगडणार आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे



## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना साहित्य वाटप!

नवी मुंबई (स. गांवकरी) : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त नवी मुंबईतील वाशी येथील एकता नगर झोपडपट्टीमध्ये समाजसेवेचा प्रेरणादायी उपक्रम उत्साहात पार पडला. समाजसेविका झोया मॅडम व दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, बिस्किटे व पाण्याच्या बाटल्या वाटप करण्यात आले. या माध्यमातून गरजू विद्यार्थ्यांना मदत करून त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचा स्तुत्य प्रयत्न करण्यात आला. कार्यक्रमास मंत्रालय प्रतिनिधी विष्णू बुरे, क्राईम रिपोर्टर महेश जाधव, प्रणित शेलार, प्राणीप्रेमी समर्थ बुरे व आशा बुरे यांची उपस्थिती होती. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकला असून, पुढेही असे सामाजिक उपक्रम राबवावेत, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## राहुरीचा पारा चार दिवसात साडेपाच अंशाने वाढला !

राहुरी (स. गांवकरी) : राहुरीचा पारा चार दिवसात साडेपाच अंशाने वाढला असून राहुरीकरांना उन्हाच्या चांगल्या झळा बसत आहेत. नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. गेल्या काही दिवसांपासून सर्वत्र वातावरणातील बदलामुळे उन्हाच्या झळा वाढल्या असल्याचे चित्र आहे . राहुरीत 10 एप्रिल ला 35 अंश इतके कमाल तापमान होते तर किमान 16 अंश तापमान होते . आज दिनांक 15 एप्रिल रोजी तापमानात आणखी वाढ होत 41.4 इतक्या तापमान उच्चांकी तापमानाची नोंद झाली असून किमान तापमानातही चांगलीच वाढ होत 18 अंश इतके तापमान आहे . त्याचा जनजीवनावर चांगलाच परिणाम दिसून येत असून नागरिकांनी विशेषतः महिला, लहान मुलांनी काळजी घेण्याचे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आली आहे.

## विवो T5 प्रो लॉन्च : 9020mAh बॅटरीसह पॉवरफुल स्मार्टफोन




पुणे (स. गांवकरी) : दीर्घकाळ टिकणारी बॅटरी, उच्च कार्यक्षमता आणि प्रगत फीचर्स यांवर लक्ष केंद्रित करत विवो इंडियाने त्यांच्या टी सिरीजमधील नवीन स्मार्टफोन Vivo T5 Pro 5G सादर केला आहे. 9020mAh क्षमतेची आतापर्यंतची सर्वात मोठी बॅटरी, शक्तिशाली प्रोसेसर आणि गेमिंग-केंद्रित तंत्रज्ञानामुळे हा स्मार्टफोन बाजारात नवा बेंचमार्क ठरण्याची शक्यता आहे. या स्मार्टफोनमध्ये स्नॅपड्रॅगन 7s Gen 4 प्रोसेसर देण्यात आला असून, तो सुमारे 1.2 दशलक्ष अँटूटू स्कोअरपर्यंत कार्यक्षमतेची हमी देतो. 120fps पर्यंत गेमिंग सपोर्टमुळे गेमिंगप्रेमींसाठी हा फोन विशेष आकर्षण ठरतो. यासोबतच 7000 चौरस मिमीची मोठी व्हेपर चेंबर कूलिंग सिस्टीम दिली असून, दीर्घकाळ वापरातही तापमान नियंत्रण प्रभावी राहते. Vivo T5 Pro ची 9020mAh बॅटरी चौथ्या पिढीच्या सिलिकॉन-कार्बन तंत्रज्ञानावर आधारित असून, दीर्घकाळ टिकणारी बॅटरी बॅकअप देते. 90W फ्लॅशचार्जमुळे अवघ्या 37 मिनिटांत 50% चार्जिंग होते. कंपनीनुसार, हा फोन 12.6 तास गेमिंग आणि 37 तास व्हिडिओ प्लेबॅक सहज देऊ शकतो. बॅटरी लाइफ एक्सटेंडर, ओव्हरनाइट चार्जिंग प्रोटेक्शन आणि बायपास चार्जिंगसारखी वैशिष्ट्येही यात आहेत.

### जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/५४/२०२६ अकोले दि.१५/०४/२०२६

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्री. रोहिदास बाळू पोपेरे, रा. कोंभाळणे**, ता. अकोले जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये अर्जदार **यांची मुलगी खुशी रोहिदास पोपेरे हिचा जन्म दि. ०४/१२/२०२३ रोजी कोंभाळणे** येथे झाला असल्याची नोंद ग्रामपंचायत कार्यालय **कोंभाळणे**, ता. अकोले यांचे जन्म–मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे. तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्री. रोहिदास बाळू पोपेरे, रा. कोंभाळणे**, ता.अकोले जि. अहिल्यानगर **यांची मुलगी खुशी रोहिदास पोपेरे हिचा जन्म दि. ०४/१२/२०२३ रोजी कोंभाळणे** येथे झाला आहे. सदर जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय **कोंभाळणे**, ता.अकोले, जि. अहिल्यानगर येथे जन्माची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. तहसिल कार्यालयासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. तहसिलदार साहेबांसमोर पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. १५/०४/२०२६ रोजी सही व शिक्कयानिशी दिले असे.

**कामगिरी क्लर्क**

**हुकूमावरुन,**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

### जाहीर नोटीस

१) गणपत बाळा हुलवळे
रा. चैतन्यपुर, ता. अकोले, जि. अहिल्यानगर .... **अर्जदार**

**विरुध्द**........१) रामचंद्र तुकाराम हुलवळे, २) रामभाऊ पाटीलबुवा हुलवळे
३) नामदेव बाळा हुलवळे, ४) उल्हासबाठ् कृष्णा हुलवळे
सर्व रा. चैतन्यपूर, ता. अकोले, जि.अहिल्यानगर ....**सामनेवाले**

या नोटीसीव्दारे कळविणेते येते की, गणपत बाळा हुलवळे, रा. चैतन्यपुर, ता. अकोले, यांनी मौजे चैतन्यपुर, ता. अकोले येथील स.न १३० (जुना स.नं.६८/१) या जमीनीचे ७/१२ मध्ये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५५ अन्वये ७/१२ वर नाव व नावासमोर क्षेत्र दाखल होणेबाबत दिनांक. १५/०४/२०२५ रोजी अर्ज केलेला आहे.

सदर अर्जाबाबत दिनांक. ०५/०५/२०२६ रोजी तहसिल कार्यालय अकोले यथे सकाळी ११.०० वाजता सुनावणी ठेवणेत आलेली आहे. तरी अर्जदार यांनी सादर केलेल्या अर्जाबाबत कोणाचे काही म्हणणे असल्यास कागदपत्रासह सदर दिनांकास उपस्थित रहावे. सदर दिनांकास आपण उपस्थित न राहिल्यास याबाबत कुणाचेही काहीएक म्हणणे नाही असे समजणेत येऊन गुणवत्तेवर निर्णय देणेत येईल. तसेच सदर प्रकरणात पुढील तारखेबाबत रोजनाम्यात नमुद करणेत येईल. याबाबत पुन्हा कोणताही पत्रव्यवहार करणेत येणार नाही याची नोंद घ्यावी.

सदर नोटीस आज दिनांक १३/०४/२०२६ रोजी सही व शिक्कयानिशी दिले असे.

**आरटीएस केस क्र.०९/२०२६**
**अकोले, दि.१३/०४/२०२६**

**तहसिलदार अकोले तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

# हनुमंत रायकर यांनी शिक्षण क्षेत्रात उत्तम ज्ञानदान केले

श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)


राजेंद्र दादा नागवडे

वांगदरी येथील शिवाजीराव नारायणराव नागवडे विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक हनुमंत रायकर यांनी आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात गुणवंत विद्यार्थी घडवून शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान दिले, असे गौरवोद्गार नागवडे कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र दादा नागवडे यांनी व्यक्त केले.

हनुमंत रायकर यांच्या सेवानिवृत्तीप्रित्यर्थ हंगेवाडी येथे शिक्षण संस्था, विद्यालय व ग्रामस्थांच्या वतीने स्नेहभोजन व कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा बँकेच्या संचालिका सौ. अनुराधाताई नागवडे होत्या.

या प्रसंगी व्यासपीठावर अध्यक्ष राजेंद्र दादा नागवडे, उपाध्यक्ष संदीप औटी, ज्येष्ठ संचालक सुभाषराव शिंदे, लक्ष्मण रायकर, जीवन शिपलकर, भाऊसाहेब नेटके, आप्पासाहेब धायगुडे, तुळशीराम रायकर, संस्थेचे निरीक्षक बी. के. लगड, निरीक्षक सचिनराव लगड, रामभाऊ रायकर, भाऊसाहेब कोळपे, माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक आप्पासाहेब जगताप, मुख्याध्यापक रवींद्र भोंडवे, रामदास झेंडे, रमजान हवलदार, नवनाथ बोडखे, मधुकर कन्हेरकर, नगरसेविका चांदणी खेतमाळीस, अशोक आळेकर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना राजेंद्र नागवडे म्हणाले की, हनुमंत रायकर यांनी 31 वर्षे प्रामाणिकपणे सेवा बजावत विद्यार्थ्यांना उत्तम शिक्षण दिले. सहकार महर्षी बापूंच्या दूरदृष्टीमुळे ग्रामीण भागात शिक्षणाची गंगा पोहोचली आणि त्यातून अनेक विद्यार्थी उच्चपदांवर पोहोचले. या यशामागे शिक्षकांचे समर्पित योगदान असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच रायकर यांच्या पुढील आयुष्यासाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या. संचालक सुभाषराव शिंदे यांनी सहकार महर्षी बापूंच्या कार्याचा उल्लेख करताना सांगितले की, त्यांच्या प्रयत्नांमुळे श्रीगोंदा तालुक्याचा सर्वांगीण विकास झाला. हनुमंत रायकर यांनीही संस्थेप्रती निष्ठा ठेवत शिक्षण क्षेत्रात मोलाची सेवा बजावली असून पुढील काळातही त्यांनी सामाजिक व शैक्षणिक कार्यात सक्रिय राहावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

अध्यक्षीय भाषणात सौ. अनुराधाताई नागवडे म्हणाल्या की, हनुमंत रायकर हे सुसंस्कृत व कर्तव्यनिष्ठ शिक्षक म्हणून ओळखले जातात. 31 वर्षांच्या सेवेनंतर त्यांच्या निवृत्तीमुळे संस्थेला त्यांची उणीव भासणार आहे. सहकार महर्षी बापूंनी शिक्षणाचा भक्कम पाया घालून तालुक्याच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले, असेही त्यांनी नमूद केले. यावेळी बी. के. लगड, रमजान हवालदार, रामभाऊ रायकर, भाऊसाहेब कोळपे, आप्पासाहेब धायगुडे, चांदणी खेतमाळीस आदींनी हनुमंत रायकर यांच्या कार्याचा गौरव केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक दिलीप काटे यांनी केले, तर आभार नगरसेविका चांदणी खेतमाळीस यांनी मानले.



# विद्यार्थ्यांसाठी मोफत वाचनालयाचे उद्‌घाटन उत्साहात संपन्न!

ब्राम्हणवाडा : (स. गांवकरी)

अकोले तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खुंटेवाडी आणि खुंटेदेवी आदिवासी मित्र मंडळ मुंबई (रजि.) यांच्या संयुक्त विद्यमाने इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत वाचनालयाचे उद्‌घाटन मंगळवार दि. १४ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता उत्साहात पार पडले. या वाचनालयात ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज यांचे जीवन व साहित्य तसेच डॉ. गोविंद मोघाजी गारे (IAS) यांच्या साहित्याचे वाचन विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या निमित्ताने सकाळी ९:१५ वाजता विद्यार्थ्यांची ग्रंथदिंडी व प्रभात फेरी काढण्यात आली. या मिरवणुकीत विद्यार्थ्यांचा उत्साह पाहण्यासारखा होता. त्यानंतर लहान विद्यार्थ्यांच्या हस्ते वाचनालयाचे उद्‌घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या उद्‌घाटक तथा अध्यक्ष म्हणून मातृशक्ती सह्याद्रीच्या अध्यक्षा श्रीमती संगीताताई तळपे उपस्थित होत्या. तसेच आदिवासी विचार मंच महाराष्ट्र राज्य व बिरसा ब्रिगेड सह्याद्रीचे समन्वयक श्री धर्मा दिघे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# 'निवडणूकजीवी' राजकारणामुळे देशाचे नुकसान

पुणे : (स. गांवकरी)

- सीमांकन घटनात्मक पद्धतीनेच व्हावे – काँग्रेसची प्रखर टीका
- महिला आरक्षण, जातीय जनगणना आणि मतदारसंघ पुनर्रचनेवर केंद्र सरकारवर निशाणा



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या धोरणांवर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसने जोरदार टीका केली आहे. 'निवडणूकजीवी व सत्ताभिलाषी राजकारणा'मुळे देशाच्या लोकशाही व्यवस्थेला धक्का बसत असून, मतदारसंघांचे सीमांकन घटनात्मक परंपरेनुसारच व्हावे, अशी ठाम भूमिका काँग्रेसने मांडली आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी पत्रकार परिषदेत बोलताना 'नारी शक्ती वंदन' विधेयकासह केंद्राच्या विविध निर्णयांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अपेक्षित केलेली सामाजिक समता व मागासवर्गीय महिलांचे प्रतिनिधित्व याकडे दुर्लक्ष करून केंद्र सरकारने महिला आरक्षणाचा विषय केवळ राजकीय फायद्यासाठी वापरला आहे. तिवारी म्हणाले की, पश्चिम बंगाल व तामिळनाडूतील निवडणुका डोळ्यासमोर ठेवून महिला मतदारांची सहानुभूती मिळवण्यासाठी केंद्र सरकारकडून घाईगडबडीत विधेयकांमध्ये बदल केले जात आहेत. "एकाच महिला आरक्षण विधेयकात पुन्हा बदल करून 'महिलांसाठी काम करत आहोत' असे दाखवण्याचा प्रयत्न हा निवडणूकजीवी राजकारणाचा भाग आहे," असा आरोप त्यांनी केला. २०२३ मध्ये संसदेत मंजूर झालेल्या 'नारी शक्ती वंदन' विधेयकानुसार लोकसभा व विधानसभांमध्ये ३३ टक्के महिला आरक्षण हे २०२९ नंतर आणि मतदारसंघांच्या पुनर्रचनेनंतर लागू होणार आहे. मात्र, यामध्ये वारंवार बदल करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. "संविधानिक संकेत धुडकावून महिला आरक्षणाचा केवळ राजकीय फायदा घेतला जात आहे," असे तिवारी म्हणाले. महिला आरक्षणाच्या अंमलबजावणीत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीय (OBC) घटकांना स्वतंत्र आरक्षण देणे आवश्यक असल्याचे काँग्रेसने स्पष्ट केले. यासाठी जातीनिहाय जनगणना आवश्यक असून, ती टाळण्याचा प्रयत्न केंद्र सरकार करत असल्याचा आरोपही करण्यात आला. "बिहार व तेलंगणाने सहा महिन्यांत जातीय जनगणना पूर्ण केली, मग केंद्र सरकार का विलंब करत आहे?" असा सवाल तिवारी यांनी उपस्थित केला. लोकसभा व विधानसभा मतदारसंघांच्या पुनर्रचनेबाबत काँग्रेसने स्पष्ट भूमिका मांडली. "ही प्रक्रिया केवळ अंकगणितावर आधारित नसून राजकीयदृष्ट्या न्याय्य असावी.

दक्षिणेकडील राज्यांनी लोकसंख्या नियंत्रण व साक्षरतेत चांगले काम केले आहे. त्यामुळे त्यांचे प्रतिनिधित्व कमी होऊ नये," अशी भूमिका काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांनी मांडल्याचे तिवारी यांनी सांगितले. महिला आरक्षणाबाबत काँग्रेसची भूमिका सातत्यपूर्ण राहिल्याचे सांगताना तिवारी यांनी इतिहासाची आठवण करून दिली. १९९६ मध्ये एच. डी. देवेगौडा यांच्या सरकारच्या काळात महिला आरक्षण विधेयक प्रथम मांडण्यात आले होते. त्यानंतर ९ मार्च २०१० रोजी डॉ. मनमोहन सिंग सरकारच्या काळात राज्यसभेत मोठ्या गदारोळात हे विधेयक मंजूर करण्यात आले होते.

# 'पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान' संपन्न

*भाजपा कार्यकर्त्यांनी जनतेला उद्योजक बनविण्याच्या सरकारच्या योजनांची माहिती द्यावी : पेसकर*

संगमनेर : (स. गांवकरी)




भाजपा कार्यकर्त्यांनी जनतेला उद्योजक बनविण्याच्या सरकारच्या योजनांची माहिती द्यावी व स्वतः पण रोजगार निर्मिती करावी तरच हे प्रशिक्षण वर्ग सफल होतील असा विश्वास भाजपा प्रशिक्षण वर्गाचे प्रदेश सह संयोजक प्रदिप पेसकर यांनी व्यक्त केला. भारतीय जनता पार्टी संगमनेर विधानसभा मधील मंडलांच्या वतीने पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान' ते समारोप प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वसंतराव गुंजाळ होते. प्रसंगी शहराध्यक्ष सौ. पायल ताजणे, पश्चिम मंडळाचे अध्यक्ष श्रीकांत गोमासे, पूर्व मंडळाचे अध्यक्ष गुलाबराजे भोसले आदी उपस्थित होते. प्रदीपजी पेसकर यांनी अत्यंत प्रभावी आणि प्रेरणादायी मार्गदर्शन केले. आपल्या भाषणात त्यांनी पक्षनिष्ठा, संघटनशक्ती आणि कार्यकर्त्यांची जबाबदारी यावर सखोल मार्गदर्शन करत प्रत्येक कार्यकर्त्याने समाजाशी सतत संपर्क ठेवून पक्ष विचार घराघरात पोहोचवण्याचे आवाहन केले. त्यांच्या ओजस्वी विचारांनी कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य, आत्मविश्वास आणि आगामी कार्यासाठी सज्जतेची भावना निर्माण झाली. कार्यकर्त्यांना वैचारिक दिशा, संघटनात्मक कौशल्ये आणि आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत नवचैतन्य निर्माण केले.

उद्‌घाटन सत्रात पक्षाचा विस्तार' या सत्रात सितारामजी भांगरे यांनी संघटन मजबूत करण्यासाठी बूथ स्तरावर काम करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यकर्त्यांना पक्षाची विचारधारा आणि कार्यकर्त्यांची भूमिका याबाबत प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यानंतर रोहितजी चौधरी यांनी 'वैचारिक अधिष्ठान' या विषयावर भाष्य करत तत्त्वनिष्ठ राजकारणाची जाणीव करून दिली. डॉ. महेंद्र कोल्हे यांनी 'आपली कार्यपद्धती' या विषयावर मार्गदर्शन केले, तर काशिनाथ पावसे यांनी 'आपल्या सरकारची कामगिरी' सविस्तर मांडली.

आधुनिक युगात सोशल मीडियाचे महत्त्व लक्षात घेऊन साहेबराव वलवे व भाऊसाहेब वाकचौरे यांनी 'सोशल मीडिया, नमो अँप व आयटी सेल' सरल अँप या विषयावर प्रभावी मार्गदर्शन केले. तसेच योगराज परदेशी यांनी 'एस. आय.आर व मतदार नोंदणी' या विषयावर माहिती देत निवडणूक प्रक्रियेत कार्यकर्त्यांची भूमिका स्पष्ट केली. सुधाकर गुंजाळ यांनी 'बुथ व्यवस्थापन व मन की बात' या विषयावर मार्गदर्शन करत प्रत्येक कार्यकर्त्याने बूथ पातळीवर सक्रिय राहण्याचे आवाहन केले.

# पॉलिसीबझारकडून सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांचा सन्मान

मुंबई : (स. गांवकरी)



भारतातील सर्वात मोठ्या ऑनलाइन विमा प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या पॉलिसीबझारने, आपल्या 'आसियन रश' (ASEAN Rush) कार्यक्रमांतर्गत सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सल्लागारांना ३९ लाख रुपयांच्या भेटवस्तू देऊन सन्मानित केले. आरोग्य, टर्म आणि बचत (देशांतर्गत आणि अनिवासी भारतीय) यांसारख्या विविध व्यावसायिक विभागांमधून निवडलेल्या एकूण ८९ सर्वोत्कृष्ट सल्लागारांना सन्मानित करण्यात आले. ही बक्षिसे वेगवेगळ्या स्तरांमध्ये विभागली गेली होती—सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सल्लागाराला मलेशियाची सर्व-खर्च-सहित सहल मिळाली, तर इतर विजेत्यांना बाईक्स, आयफोन, ॲप वॉचेस, स्मार्ट टीव्ही आणि ॲमेझॉन व्हाउचर्स यांसारख्या भेटवस्तू मिळाल्या. हा नवीनतम बदल पॉलिसीबझारच्या 'रिवॉर्ड्स अँड रिकग्निशन' (R&R) फ्रेमवर्कमधील एक धोरणात्मक बदल दर्शवतो, जो पारंपरिक रोख प्रोत्साहनांपासून उच्च-मूल्याच्या भेटवस्तू आणि आंतरराष्ट्रीय प्रवासाच्या अनुभवांवर लक्ष केंद्रित करण्याकडे वळत आहे. या यशानंतर, कंपनीने 'आसियान रश' कार्यक्रम सुरू केला आहे, ज्यामध्ये या वर्षीच्या विजेत्यांना मलेशियाची सर्व-खर्च-सहित सहल आणि इतर मौल्यवान भेटवस्तू मिळतील. पॉलिसीबझारचे सह-संस्थापक आणि मुख्य विक्री अधिकारी, जेरी भुतिया म्हणाले, "कुटुंबांना त्यांचे आर्थिक भविष्य सुरक्षित करण्यास मदत करण्याच्या व्यापक उद्देशासाठी पॉलिसीबझार कटिबद्ध आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर व राघोजी भांगरे यांची जयंती संपन्न

एकदरे : (स. गांवकरी)



अकोले तालुक्यातील तिरडे येथे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर तसेच आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे यांची संयुक्त जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी सर्वप्रथम महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर तसेच आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे व थोर समाज पुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना पुष्पहार घालून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवल चौरे हे होते. प्रमुख व्याख्याते यांनी बोलताना सांगितले की,१४ एप्रिल हा दिवस नव्हता हा सोन्याचा सूर्य ज्यादिवशी उगवला तो दिवस सपूर्ण राष्ट्राच्या आनंदामध्ये एक वेगळे पण निर्माण करून गेले आहे.आज आपण आनंदाने जगतोय सुखाची भाकरी खातोय स्वतःच्या घरात आनंदाने राहतोय हे सगळे उपकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आहेत.कार्यक्रमाचे अध्यक्ष नवल चौरे यांनी सांगितले की,बाहेरील देश सुद्धा या महामानवाचा अभ्यास करतात.शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा असा संदेश दिला. भगवान खोकले यांनी यावेळी सांगितले आपण जे ज्ञान आत्मसात केलं ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळे केलं.

त्यांनी संविधानाची निर्मिती केली नसती तर तुम्ही आम्ही एकत्र राहिलो नसतो.यावेळी भव्य अशी ढोल ताशा वाजवत गावातून मिरवणुक काढण्यात आली.

यावेळी गावातील सर्व समाज बांधव एकत्रीत येऊन दरवर्षी ही संयुक्त जयंती साजरी करतात. मिरवणुकीनंतर आलेल्या मान्यवरांचे सत्कार करण्यात आले.तसेच कार्यक्रम संपल्यानंतर भव्य असा महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. गावातील सर्व समाज बांधव तसेच महिला वर्ग तरुण मित्र मंडळ यांनी हा जयंती उत्सव मोठ्या दिमाखात साजरा करण्यात आला.

यावेळी उपस्थित आदिवासी विकास परिषदेचे जिल्हा सरचिटणीस प्रमुख व्याख्याते काळू भांगरे,ॲडव्होकेट गणेश खोकले,प्रमुख नेते दिपक खोकले,सरपंच भगवान खोकले,सुभाष जगताप, नवनाथ जाधव,ग्रामपंचायत सदस्य प्रवीण जाधव,पत्रकार बाजीराव भांगरे,तिरडे सरपंच विठ्ठल गोडे,सामाजिक कार्यकर्ते गोरख भांगरे,तसेच गावातील सर्व महिला तरुण मित्र मंडळ उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे आभार सुभाष जगताप यांनी मानले.

# आरोग्य सुविधा तळागाळापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न : गटनेते श्रीमंत ढोले



इंदापूर : (स. गांवकरी)

इंदापूर तालुक्यातील लाखेवाडी येथे 'माझे गाव आरोग्य संपन्न गाव' या महत्त्वाकांक्षी अभियानांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबिराला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. आरोग्यवर्धिनी उपकेंद्र लाखेवाडी व ग्रामपंचायत लाखेवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडलेल्या या शिबिरात शेकडो गरजू नागरिकांची मोफत तपासणी करून त्यांना आवश्यक उपचार व मार्गदर्शन करण्यात आले. ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा त्यांच्या दारात उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित हा उपक्रम अत्यंत प्रभावी ठरला. आर्थिक अडचणींमुळे महागड्या तपासण्या करू न शकणाऱ्या रुग्णांसाठी हे शिबिर मोठा दिलासा ठरले. मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन या शिबिराचे उद्घाटन पुणे जिल्हा परिषदेचे सदस्य व गटनेते श्रीमंत ढोले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आदर्श सरपंच डॉ. चित्रलेखा ढोले यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच ग्रामपंचायत सदस्य, आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आरोग्य सुविधा तळागाळापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न उद्घाटनप्रसंगी बोलताना श्रीमंत ढोले यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या गावातच दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. अनेक वेळा आर्थिक अडचणींमुळे नागरिकांना वैद्यकीय तपासण्या करून घेणे शक्य होत नाही. अशा परिस्थितीत तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली मोफत तपासणी व उपचार मिळणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. शासनाच्या विविध आरोग्य योजनांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांची सातत्याने अंमलबजावणी केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. या शिबिरात रक्त तपासणी, डोळ्यांची तपासणी, ईसीजी, एक्स-रे यांसारख्या विविध तपासण्या मोफत करण्यात आल्या. तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने रुग्णांची सखोल तपासणी करून आवश्यक औषधोपचार सुचविले. ज्येष्ठ नागरिक, महिला व बालकांची विशेष काळजी घेण्यात आली. काही गंभीर रुग्णांना पुढील उपचारांसाठी संबंधित रुग्णालयात पाठविण्यात आले.



ठाणे : दिवा शहरात डॉ. बाबासाहेब आंबडेकरांच्या १३५ व्या जयंती निमित्ताने कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने सहायक पोलीस आयुक्त प्रिया डमाळे व मुंब्रा पोलिसांनी भेट दिली प्रसंगी अनेक भीम अनुयायांनी पोलीस प्रशासनाचे स्वागत केले. (फोटो - संतोष पडवळ)

## थोडक्यात बातम्या...




### डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती उत्साहात साजरी

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : श्री शिवाजीराव नागवडे विधी महाविद्यालय, श्रीगोंदा, जिल्हा अहिल्यानगर येथे दिनांक १५ एप्रिल २०२६ रोजी महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मा. राजेंद्रदादा नागवडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त विद्यार्थ्यांना भारतीय राज्यघटना तसेच मानवी हक्कांविषयी सखोल व मोलाचे मार्गदर्शन केले. संस्थेच्या उपाध्यक्षा मा. अनुराधाताई नागवडे यांनीही विद्यार्थ्यांना यशस्वी जीवनासाठी प्रेरणादायी संदेश दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अंजुला चौबे मॅडम उपस्थित होत्या. तसेच संस्थेचे निरीक्षक एस. पी. गोलांडे सर, डॉ. दिपाली जावळे, प्रा. रुपाली गोळे मॅडम यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दिपाली जावळे यांनी केले. प्राचार्या डॉ. चौबे मॅडम यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर विचार मांडले. यावेळी महाविद्यालयातील नॉन-टीचिंग स्टाफमधील क्षितिज शितोळे सर व अर्पित रणशिंग सर उपस्थित होते. कार्यक्रमास विधी महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. रुपाली गोळे मॅडम यांनी आभार प्रदर्शन केले.



### शेळगाव येथे आदर्श शिक्षक भारत ननवरे यांचा गौरव

इंदापूर (स. गांवकरी) : क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंती उत्सव समिती व ग्रामस्थ शेळगाव यांच्या वतीने आयोजित जयंती सोहळ्यात भोसलेवस्ती शाळेचे उपक्रमशील शिक्षक भारत ननवरे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. पंचायत समिती इंदापूर यांच्या कडून प्रदान करण्यात आलेला आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल हा गौरव सोहळा पार पडला. या प्रसंगी भारत ननवरे यांना ट्रॉफी तसेच 'गुलामगिरी' हे प्रेरणादायी पुस्तक देऊन सन्मानित करण्यात आले. जयंतीच्या दिवशीच हा सन्मान मिळाल्यामुळे कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. या सन्मानामुळे त्यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेतली गेल्याची भावना व्यक्त करण्यात आली. आयोजक समिती व ग्रामस्थांचे त्यांनी मनःपूर्वक आभार मानले. तसेच हा सन्मान पुढील कार्यासाठी अधिक प्रेरणादायी ठरेल, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला.

### वडापुरी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी



इंदापूर (स. गांवकरी) : वडापुरी येथे भिमसेना तरुण व्यायाम मंडळ वडापुरी यांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सालाबाद प्रमाणे जयंती उत्सव उत्साहात साजरी करण्यात आली. सकाळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन व सामुदायिक बुद्ध वंदना घेऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यास उपस्थित ग्रामस्थांच्या वतीने त्यांचे रोख स्वरूपात रक्कम भेट देऊन कौतुक करण्यात आले. सायंकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता रमाबाई यांच्या प्रतिमांचे सुवाद्य मिरवणूक काढण्यात आली. यामध्ये लहान- थोर, आबाल वृद्ध यांच्या बहुसंख्य उपस्थितीमध्ये मिरवणूक संपन्न झाली. यानंतर स्नेहभोजनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

### शुभांगी राऊतमारे व कथालेखन स्पर्धेत श्रद्धा वझे यांना प्रथम पारितोषिके जाहीर

अहिल्यानगर (स. गांवकरी) : शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय काव्य व कथालेखन स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला असून विविध जिल्ह्यांतील साहित्यिकांनी या स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. कविता लेखन स्पर्धेत परभणी येथील शुभांगी राऊतमारे व कथालेखन स्पर्धेत कल्याण येथील सौ.श्रद्धा वझे यांना प्रथम पारितोषिके जाहीर करण्यात येत असल्याची माहिती परिषदेचे कार्यवाह शाहिर भारत गाडेकर व सहसचिव प्रा.डॉ.अनिल गर्जे यांनी दिली. कविता लेखन स्पर्धेत परभणी येथील शुभांगी राऊतमारे यांनी प्रथम क्रमांक पटकावला, तर बीड येथील श्रीराम अजब यांनी द्वितीय क्रमांक मिळवला. तृतीय क्रमांक माखजन (ता. संगमेश्वर) येथील श्रीमती वर्षा पोंक्षे यांना मिळाला असून उत्तेजनार्थ पारितोषिक कोलखेडा (जि. अकोला) येथील तुळशीराम बोबडे व पुणे येथील श्रीपाद टेंबे यांना जाहीर करण्यात आले आहे.

# चिंचवाडीतील वैष्णव मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

पालघर : (स. गांवकरी)

शहापूर तालुक्यातील विहिगाव पैकी चिंचवाडी येथे पंढरपूर वारी निमित्त आयोजित करण्यात आलेल्या एकदिवसीय वैष्णव मेळाव्याला ग्रामस्थ आणि परिसरातील भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सकाळी ११ वाजता प्रमुख साधू-संतांच्या उपस्थितीत मेळाव्याचे उद्घाटन मोठ्या भक्तिभावात पार पडले. यावेळी उपस्थितांनी हरिनामाच्या गजरात कार्यक्रमाची सुरुवात केली.

मेळाव्याच्या पहिल्या सत्रात धार्मिक वातावरणात विविध प्रवचने आणि भजनांचा कार्यक्रम पार पडला. दुपारी विशेष कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. या कीर्तनातून वारकरी परंपरेचे महत्त्व, पंढरपूर वारीची परंपरा आणि भक्तीमार्गाचे महत्त्व यावर प्रभावी मार्गदर्शन करण्यात आले. कीर्तनकारांनी आपल्या ओजस्वी वाणीने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. दुपारी ३ ते ४ या वेळेत सामुदायिक हरिपाठाचे आयोजन करण्यात आले. गावकरी, महिला, युवक आणि वृद्धांनी मोठ्या संख्येने यात सहभाग घेतला. एकसुरात हरिपाठ झाल्याने परिसर भक्तिमय झाला होता. या उपक्रमामुळे एकात्मता आणि सामूहिक भक्तीची भावना अधिक दृढ झाली.सायंकाळी ५ वाजता उपस्थित भाविकांसाठी तीर्थ आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. शिस्तबद्ध पद्धतीने सर्वांना महाप्रसाद वितरित करण्यात आला. ग्रामस्थांनी सेवा भावनेतून या व्यवस्थेत मोठे योगदान दिले. रात्री ९ वाजता ह.भ.प. इंदुबाई कुंदे यांच्या कीर्तनाने कार्यक्रमाची सांगता झाली. त्यांच्या प्रभावी कीर्तनातून भक्ती, साधना आणि समाजातील नैतिक मूल्यांवर प्रकाश टाकण्यात आला. या कीर्तनाला विशेष प्रतिसाद मिळाला आणि उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.विहीगाव व चिंचवडी येथील ग्रामस्थांनी या मेळाव्याचे आयोजन यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. तसेच कसारा परिसरातील ग्रामस्थांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून वैष्णव मेळाव्यात सहभाग नोंदवला. संपूर्ण दिवस भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या मेळाव्यामुळे गावात धार्मिक आणि सामाजिक एकोपा अधिक बळकट झाल्याचे दिसून आले.



**कीर्तन, हरिपाठ आणि महाप्रसादाने भक्तिमय वातावरण**

# 'बॅटलग्राउंड सीझन २'चा झलकप्रदर्शन सोहळा

मुंबई : (स. गांवकरी)

शरीरसामर्थ्य, डावपेच आणि मानसिक ताकदीची कठीण परीक्षा पाहणारा लोकप्रिय स्पर्धात्मक कार्यक्रम 'बॅटलग्राउंड' नव्या रूपात प्रेक्षकांसमोर येत आहे. पहिल्या पर्वाला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादानंतर आता 'बॅटलग्राउंड सीझन २ चा झलकप्रदर्शन सोहळा पार पडला असून हा कार्यक्रम १७ एप्रिल २०२६ पासून अमेझॉन एमएक्स प्लेअरवर दररोज नव्या भागांसह विनामूल्य पाहता येणार आहे. या पर्वात एकूण १६ स्पर्धक चार संघांमध्ये विभागले गेले आहेत. मुंबई स्ट्रायकर्स संघाचे नेतृत्व प्रियांका चाहर चौधरी, भोजपुरी भौकाल्सचे नेतृत्व खेसारी लाल, दिल्ली डॉमिनेटर्सचे नेतृत्व फुक्रा इन्सान, तर तेलुगू टायगर्सचे नेतृत्व कबड्डीपटू राहुल चौधरी करत आहेत. स्पर्धेचे मार्गदर्शक म्हणून क्रिकेटपटू शिखर धवन यांची भूमिका यंदाही महत्त्वाची ठरणार आहे.




■ १७ एप्रिलपासून अमेझॉन एमएक्स प्लेअरवर विनामूल्य प्रक्षेपण

# एस टी बसस्थानकात खाजगी वाहन मोठ्या प्रमाणात



शिवनेरी : (स. गांवकरी)

जुन्नर व आळेफाटा एस टी बसस्थानकात खाजगी वाहन मोठ्या प्रमाणात ये - जा असल्यामुळे एसटी बस वाहन चालकाला व प्रवाशांना खुप त्रास होत आहे. येथील एस टी बसस्थानकातील चौकशी ऑफिस मधील अधिकारी वांरवार सुचना पुकारुन खाजगी वाहन चालकांनी सुरक्षा व्यवस्था बाबत नियम पाळा असे सांगितले जाते , पण कोणिही नियम पाळत नाही. एसटी बस स्थानकातील गर्दीमुळे अनेक वेळा पाकिट मार , दागिन्यांची चोरी व अपघात झाले आहेत. येथील एस टी बसस्थानकात मुंबई , पुणे , बारामती, नगर , भिमाशंकर, औरंगाबाद, सोलापूर,बीड , तुळजापुर , सातारा, सांगली, जळगाव, पंढरपूर , तालुक्यात व इतर ठिकाणी बस ची मोठ्या प्रमाणात ये -- जा सुरू आहे. महिला वर्ग , जेष्ठ नागरिक व विद्यार्थी सध्या यात्रा उत्सव व लग्न समारंभ असल्याने मोठ्या प्रमाणात बसस्थानकात गर्दी होती. खाजगी वाहन यांचे नियोजन व शिस्त नसल्याने एसटी वाहन चालक यांना वाहतूक कोंडी चा त्रास झालेला आहे. खाजगी वाहतूक कोंडी प्रश्न कधी सुटणार ? याकडे एसटी महामंडळ व प्रवासी यांचे लक्ष लागले आहे .

*रोटरी क्लब ऑफ इंदापूर सेन्ट्रल आणि 'झी मराठी' यांच्या संयुक्त विद्यमाने*

# इंदापूर शहरात रंगला 'पैठणीचा महासंग्राम



इंदापूर : (स. गांवकरी)

रोटरी क्लब ऑफ इंदापूर सेन्ट्रल आणि 'झी मराठी' यांच्या संयुक्त विद्यमाने इंदापूर शहरात महिलांसाठी आयोजित करण्यात आलेला 'पैठणीचा महासंग्राम' हा बहुचर्चित कार्यक्रम ९ एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात आणि दिमाखात पार पडला. या स्पर्धेला इंदापूरकर महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत कार्यक्रमाची रंगत वाढवली. नगरपालिकेजवळील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा क्र. १ व २ येथे सायंकाळी ठीक ६.०० वाजता या रंगतदार खेळाला सुरुवात झाली. 'इंदापुरात रंगणार पैठणीचा डाव' या घोषणेप्रमाणेच, कार्यक्रमात उत्साह, रंगत आणि थरार यांचा एक अनोखा संगम पाहायला मिळाला. रोजच्या धकाधकीच्या जीवनातून वेळ काढत शेकडो महिलांनी या खास स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

या शानदार कार्यक्रमाला सुप्रसिद्ध अभिनेत्री तनिष्का विशे व प्रियांका मुंगेकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांच्या आगमनाने उपस्थित महिलांचा उत्साह दुणावला. यांच्यासोबतच इंदापूर शहरातील अनेक प्रतिष्ठित महिलांनी या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून हजेरी लावली. यामध्ये शोभाताई भरणे, माजी नगराध्यक्षा अंकीताताई शहा, वैशाली शहा, नगरसेविका दीप्ती राऊत, मयुरी उंबरे आणि सुनिता नलवडे यांचा विशेष समावेश होता. या सर्व मान्यवर महिलांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला `एक वेगळीच उंची मिळाली.

विविध मनोरंजक खेळ आणि उखाण्यांच्या या रंगतदार डावात महिलांनी आपल्या कौशल्याची चुणूक दाखवली. या स्पर्धेत जिंकलेल्या अनेक महिलांनी भरघोस बक्षिसांची लयलूट केली. तर, सर्व फेऱ्या पार करून अंतिम फेरी जिंकणाऱ्या महाविजेत्या अश्विनी गोळे, मनीषा नरुटे व आकांक्षा शहा यांना अत्यंत आकर्षक अशी 'मानाची पैठणी' देऊन गौरविण्यात आले. यासोबत ५० महिलांना लकी ड्रॉ मार्फत बक्षिसे तर ३०० महिलांना आकर्षक भेटवस्तू देण्यात आल्या.

डिस्ट्रीक्ट ३१३१ लिटरसी डायरेक्टर रो. वसंतराव मालुंजकर आणि अध्यक्ष रो. ज्ञानदेव डोंबाळे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली या सोहळ्याचे संयोजन करण्यात आले. विशेष म्हणजे, या महिलांच्या कार्यक्रमाची धुरा समन्वयक म्हणून रो. मंदाकिनी डोंबाळे, रो. अमृता शिंदे व रो. हेमलता मालुंजकर यांनी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने सांभाळली. या शानदार यशाबद्दल बोलताना रोटरी क्लब ऑफ इंदापूर सेन्ट्रलचे अध्यक्ष रो. ज्ञानदेव डोंबाळे म्हणाले, "इंदापूरमधील महिलांसाठी हा खास कार्यक्रम आयोजित करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी रोटरी क्लब नेहमीच असे उपक्रम राबवण्यासाठी कटिबद्ध राहील." कार्यक्रमाचे सूत्रसंचालन झी मराठीचे श्री.अभ्यंकर यांनी केले. या कार्यक्रमासाठी रो. आझाद पटेल, रो. मोहन भोसले, रो. समीर सूर्यवंशी, रो. राजाराम सागर, रो.विष्णू पवार, रो. मोरेश्वर कोकरे, रो. सुधीर शेंडे, रो. चंद्रकांत तरंगे, रो. किरण सातपुते, रो. अमर बंडगर आणि रो. सुनील टेळे उपस्थित होते. रोटरी क्लबच्या या यशस्वी आणि नेटक्या आयोजनाबद्दल इंदापूरमध्ये सर्वत्र कौतुक होत आहे.

# तपोवन केंद्रात श्री. स्वामी समर्थ यांची पुण्यतिथी उत्सवाची सांगता





अहिल्यानगर : (स. गांवकरी)

सावेडी उपनगरातील छत्रपती संभाजी - नगर रोडवरील तपोवन येथील श्री.स्वामी समर्थ महाराज यांची तपोवन केंद्रात पुण्यतिथी सप्ताहाची सांगता महानैवेद्य महा आरती, महाप्रसादाने मोठ्या उत्साहात भक्तिमय वातावरणात झाली. सावेडी उपनगरात तपोवन रोड येथील तपोवन केंद्रात स्वामी समर्थ पुण्यतिथी उत्सव निमित्त भव्य पारायण सोहळा पार पडला. यावेळी २४९ महिलांनी सामूहिक श्री. गुरुचरित्र पारायण वाचन केले. गेले सात दिवस नित्यनियमाने पारायण सोहळा, अखंड नामजप, आरती असे धार्मिक कार्यक्रम पार पडले. दिंडोरी प्रणित गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली तपोवन केंद्रात वर्षभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन होते. बाल संस्कार वर्गामुळे देखील चांगले विद्यार्थी येथे घडत आहेत.येथील केंद्र प्रतिनिधी श्री. व सौ.सोनाली बबन पालवे यांच्या हस्ते महानैवेद्य अर्पण करून महाआरती करण्यात आली. याप्रसंगी नगरसेविका रोशनीताई त्र्यंबके, संध्याताई पवार,माजी नगरसेविका रूपालीताई वारे,आकाश त्र्यंबके आदींसह स्वामी समर्थ यांचे सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सप्ताह मध्ये महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. केंद्राचे काम पाहून भाविकांनी समाधान व्यक्त केले. महानैवेद्य आरती झाल्यावर महाप्रसादाचा लाभ भाविकांनी घेतला. सप्ताह यशस्वी करण्यासाठी तपोवन केंद्राचे सर्व सेवेकरी, कार्यकर्ते, नागरिकांनी परिश्रम घेतल्याबद्दल बबन पालवे यांनी सर्वांचे आभार मानले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# ना. सुहास कांदे यांच्याकडून सोनवणे यांचा गौरव

नाशिक : (स. गांवकरी)

निफाड तालुक्यातील मांजरगाव भूमिपुत्र तसेच महिरावणी येथील मातोश्री गि.दे.पाटील माध्यमिक विद्यालयाचे उपक्रमशील दिव्यांग शिक्षक बाळासाहेब सोनवणेसर यांची शासन मान्यताप्राप्त महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटनेच्या "राज्य अध्यक्ष" पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा महाराष्ट्र राज्य विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती अध्यक्ष नामदार सुहासआण्णा कांदे (आमदार,नांदगाव विधानसभा मतदारसंघ)यांच्या हस्ते शाल व छत्रपती शिवाजी महाराजांची पवित्र प्रतिमा देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी बोलताना नामदार सुहासआण्णा कांदे यांनी बाळासाहेब सोनवणे यांच्या कार्याचे कौतुक करत, राज्यातील दिव्यांग बांधवांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांनी प्रामाणिकपणे व समर्पित भावनेने कार्य करत राहावे,अशा शुभेच्छा दिल्या. त्यांच्या नेतृत्वामुळे दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांना योग्य दिशा मिळेल,असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.यावेळी जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष गोरख कुणगर सर व सतीश सांगळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. सत्काराला उत्तर देताना बाळासाहेब सोनवणे सर यांनी हा सन्मान संपूर्ण दिव्यांग कर्मचारी बांधवांचा असल्याचे नमूद करत, समाजहिताचे कार्य अधिक जोमाने व सेवाभावाने पुढे नेण्याचा दृढ संकल्प व्यक्त केला. शिव परमात्मा शिवबाबांच्या कृपेने समाजसेवेची वाटचाल अधिक प्रभावीपणे सुरू ठेवण्याची ग्वाही त्यांनी दिली.

बाळासाहेब सोनवणे सर यांची महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटनेच्या राज्य अध्यक्षपदी झालेली निवड ही अत्यंत योग्य व अभिमानास्पद आहे. त्यांनी दिव्यांग बांधवांच्या हक्कांसाठी सातत्याने व प्रामाणिकपणे केलेले कार्य खरोखर प्रेरणादायी आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे राज्यातील दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांना निश्चितच न्याय व योग्य दिशा मिळेल, असा मला विश्वास आहे.त्यांनी सर्वांना सोबत घेऊन संघटनेचे कार्य अधिक प्रभावीपणे पुढे न्यावे. शासनाच्या योजना व सुविधा दिव्यांग बांधवांपर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांनी पुढाकार घ्यावा.त्यांच्या पुढील कार्यासाठी माझ्याकडून मनःपूर्वक शुभेच्छा!

**- ना. सुहासआण्णा कांदे, अध्यक्ष, विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती, महाराष्ट्र राज्य (राज्यमंत्री दर्जा)**

# थोडक्यात पण महत्वाचे




## रखडलेल्या बिलांसाठी संतप्त ठेकेदारांकडून रास्ता रोको आंदोलन

इगतपुरी (स. गांवकरी) : इगतपुरी तालुक्यातील महत्वाच्या गावांमध्ये ठेकेदारांनी दळणवळणासाठी स्व खर्चाने रस्ते बनवले. त्या मार्गाने सुरळीत वाहतुकही सुरु झाली. मात्र २०२३ पासून त्या सर्व कामांची बिले अदा झालेली नाही. त्यामुळे अनेक ठेकेदारांना कर्जाचा डोंगर घेऊन अडचणींना सामोरे जावे लागत आहे. तयार केलेले रस्ते हे ठेकेदारांनी स्वखर्चाने कर्जबाजारी होऊन केलेले असून शासनाने अद्याप त्यापोटी बिल दिले नाही. म्हणून आज १५ एप्रिल पासून जोपर्यंत बिल मिळत नाही तोपर्यंत सर्व रस्ते सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद करण्यात येणार आहे, असा इशारा देण्यात आला. ठेकेदार राजू पानसरे यांच्या नेतृत्वाखाली ठेकेदार जनार्धन सांगळे, दत्ता शेलार, निलेश पाटील, विशाल कातोरे, तुषार लोणारे, अजित सकाळे, अक्षय गुळवे यांनी वाडीवऱ्हे ते जाधववाडी, देवाची वाडी, वाडीवऱ्हे ते रायगडनगर ( चिमणबारी ), टाकेद म्हैसवळण रस्ता अडवून आंदोलन केले. यावेळी संबंधित गावांच्या ग्रामस्थांनी विनंती केल्यामुळे आंदोलन मागे घेतले आहे. मात्र आठवडाभरात शासनाने यावर मार्ग न काढल्यास कायमस्वरूपी रस्ते बंद करू असा इशारा ठेकेदारांनी दिला. आंदोलनाप्रसंगी वाडीवऱ्हेचे माजी सरपंच रावसाहेब कातोरे, सूरज कातोरे, दिलीप मालुंजकर, दशरथ दिवटे, भीमा मालुंजकर, कचरू शेजवळ, गणपत दिवटे, मनोज खांडबहाले, संतोष गवते, श्रीराम मालुंजकर, प्रवीण मालुंजकर आदी उपस्थित होते.

## डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची 135 वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी

नेवासा (स. गांवकरी) : नेवासा तालुका ऑटो रिक्षा संघटनेच्या वतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची 135 वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे अनुमोदन मोहन जाधव व सचिन मस्के व सुनिल काळे यांनी केले. यावेळी नेवासा पोलीस स्टेशनचे निरीक्षक पी.आय महेश पाटील, नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष शालिनीताई संजय सुखदान, माजीनगरसेवक सचिन नागपुरे, सलीम भाई अल्ताफ पठाण ,बापूसाहेब कापरे , तसेच व्यापारी वर्गातील रामभाऊ घोलप, प्रवीण शहाणे, एकनाथ वाघ, संतोष परबळकर, बाळासाहेब सोनवणे, सोमनाथ गायकवाड, संजय मिटकरे, बबन वाडेकर आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच रिक्षा संघटनेचे अध्यक्ष भरत वालतुरे, सचिव योगेश काळे, उपाध्यक्ष गंगाराम नवसे यांच्यासह रिक्षाचालक सदस्य श्रीनिवास डहाळे आप्पासाहेब बंदिवान, किरण डाके, प्रमोद काळे, गंगाराम दगडे, संजय पोकळे, भाऊसाहेब डाके सचिन नागपुरे ,श्रीपतीराव दारुंटे, कैलास धारकर, रमेश गायकवाड आप्पासाहेब बंदीवान, अमन मंसूरी, आरिफ पठाण, योगेश दारुंटे, वैभव घोडके, मुन्ना पठाण, दिनेश लष्करे तसेच सामाजिक कार्यकर्ते, संजू भाऊ सुखदान ,दत्तू इरले, बाबासाहेब दगडे, अनिल वाडेकर, संकेत मिटकरे, व इतर नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षा येत्या २५ एप्रिलला; तीन परीक्षा केंद्र

ओतूर (स. गांवकरी) : पुणे येथील नौरोसजी वाडिया कॉलेजच्या सर्वोत्कृष्टता केंद्राच्या वतीने महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षा (MTSE) यावर्षी २५ एप्रिल २०२६ रोजी घेण्यात येणार असल्याची माहिती परीक्षेचे तालुका समन्वयक भाऊसाहेब खाडे यांनी दिली. याविषयी अधिक माहिती देताना खाडे म्हणाले की, महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षा इयत्ता आठवी, नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी एप्रिलच्या अखेरीस घेतली जाते. ग्रामीण भागातील प्रज्ञावंत विद्यार्थ्यांचा शोध घेणे, स्पर्धा परीक्षेचा त्यांचा पाया भक्कम करणे व शिष्यवृत्ती पारितोषिक देऊन त्यांना प्रेरणा देणे हा या परीक्षेचा मुख्य उद्देश आहे. या परीक्षेची प्रवेशपत्र १५ एप्रिल २०२६ पासून वेबसाईटवर उपलब्ध झालेली आहेत. जुन्नर तालुक्यात यावर्षी चैतन्य विद्यालय ओतूर, श्री.अनंतराव कुलकर्णी इंग्रजी माध्यम शाळा नारायणगाव, ज्ञान मंदिर हायस्कूल आळे या तीन ठिकाणी परीक्षेची केंद्र आहे. परीक्षार्थी विद्यार्थ्यांनी शनिवार दिनांक २५ एप्रिल २०२६ रोजी आपापल्या परीक्षा केंद्रावर सकाळी साडेनऊ वाजता उपस्थित राहावे. परीक्षे संदर्भात किंवा परीक्षा केंद्रासंदर्भात काही अडचण असल्यास ९८६०६६४४०२ या भ्रमणध्वनीवर संपर्क करावा, असे आवाहन समन्वयक खाडे यांनी केले आहे.

# एसआईआर प्रक्रिया पारदर्शीपणे राबवा

## काँग्रेस, वंचित बहुजन आघाडीची नेवासा तहसीलदारांकडे मागणी

नेवासा : (स. गांवकरी)




मतदार दुरुस्तीसाठी राबवलेली एसआईआर प्रक्रिया पारदर्शी पार पडण्याची मागणी काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीने नेवासा तहसीलदार यांच्याकडे केली. देशभरात नुकतीच मतदार यादी दुरुस्तीसाठी एसआईआर प्रक्रिया राबविण्यात येत आहे. परंतु ही प्रक्रिया संशयास्पद असल्याचे दिसत असून जाणूनबुजून काही समाजाचे नावे मतदार यादीतून काढून टाकण्याचा घाट घातल्याचे दिसून येत असून याबाबत काँग्रेस, वंचित बहुजन आघाडीने आक्षेप नोंदवला आहे. नेवासा तालुक्यात ही प्रकिया पारदर्शी राबावी यासाठी आज तहसीलदार व निवडणूक अधिकारी यांची भेट घेऊन मतदार यादी दुरुस्ती संदर्भात काही मागण्या करण्यात आल्या. मागण्यात प्रामुख्याने मतदार यादीतून ज्या व्यक्तीची नावे वगळणार त्याचे आधार, मतदान कार्ड व इतर रहिवासी पुराव्याची योग्य पडताळणी करावी,वगळलेल्या व्यक्तीस नाव वगळल्याचे स्पष्ट व लेखी कारण देण्यात यावे.ते व्हाट्सपद्वारे देता कामा नये,वगळलेल्या नावाची त्या गावातील ग्रामपंचायतला देण्यात यावी. वगळलेल्या नावाचा विषय हा ग्रामसभेत उपस्थित करण्यात यावा.सद्य स्थितीतील मतदार यादीत अनेक व्यक्तीची नावे दुबार, तीन वेळा आली आहेत ती दुरुस्ती करण्यात येऊन त्या व्यक्तीचे नाव एकदाच आले पाहिजे.सद्य मतदार यादीत घर क्रमांक चुकीचे टाकण्यात आले आहे ते दुरुस्ती करण्यात यावे व घराचा खरा नंबर यादीत टाकण्यात यावा. कारण एकाच घरात दहा ते बारा हजार मतदान दाखविण्यात आले आहे.मतदार यादीत मतदाराचे नाव पूर्ण असावे, तसेच त्याच्या वडिलांचे नाव देखील पूर्ण असावे, नविन मतदार यादीत समाविष्ट करताना गावात कोणीही वंचित राहणार नाही याची दाखल घ्यावी तसेच नवीन मतदाराची पूर्ण पुराव्याची शहानिशा करावी.अनेक व्यक्तीची नावे राहत्या गावाऐवजी इतर गावात गेली ती दुरुस्ती करण्यात यावी.

अशा सुधारणा या एसआईआर प्रक्रिया राबविताना व मतदार यादी सुधारणा करण्याबाबत सुचवील्या आहेत. यावेळी वंचितचे पोपटराव सरोदे यांनी एसआईआर प्रक्रियेत कुठल्याही प्रकारची चूक झाल्यास निवडणूक अधीकाऱ्यास जबाबदार धरण्यात येऊन याविरोधातकठोर भूमिका घेणार असल्याचे स्पष्ट केले. काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी एसआईआर प्रक्रिया ही लोकशाहीचा पाया समजल्या जाणाऱ्या मतदाराच्या अधिकाराची प्रक्रिया आहे. त्यामुळे जनतेने याबाबत अंत्यन्त सजग राहणे गरजेचे आहे. एसआईआर पारदर्शी पार पाडण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे स्पष्ट केले. निवेदनावेळी काँग्रेस शहराध्यक्ष अंजुम पटेल,वंचितचे उपाध्यक्ष संदीप क्षीरसागर, महासचिव गणपत मोरे, युवा नेते हरीश चक्रनारायण आदिसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# इंजिनिअर तरुणाकडून तरुणीची फसवणूक

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

■ आई, वडिलांसह सात जणांविरुद्ध गुन्हा

लग्न करून पैसे, सोने घेऊन वधू फरार झाली अशा घटना घडतात.मात्र अकोले तालुक्यात चक्क विवाहित मुलाने पहिला विवाह दडवून दुसऱ्या विवाहाची तयारी करत हाय प्रोफाईल फसवणूक केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. आधीच लग्न झालेल्या आणि नंतर दुसऱ्या मुलीशी साखरपुडा करणाऱ्यास अकोले पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. संगमनेर तालुक्यातील राजापूर येथील मूळचे रहिवासी असलेले हासे कुटुंब सध्या रत्नागिरी (मंडणगड) येथे राहते.मुलाचे वडील सेवानिवृत्त पशुवैद्यकीय अधिकारी, आई शिक्षिका, मुलगा पुण्यात इंजिनिअर असल्याची माहिती शादी डॉट कॉमवर आली. त्यानंतर अकोले तालुक्यातील एका कुटुंबातील मुलीला हे स्थळ शोधले गेले. लग्नाची बोलणी झाली. पाहुण्यांचे मुलीच्या घरी येणे- जाणे सुरू झाले. कोतुळात एक हजार माणसांच्या उपस्थितीत साखरपुडाही झाला. सोन्याची चेन, अंगठी यासाठी ऑनलाइन पैसे नवऱ्यामुलाला दिले गेले. १० मे रोजी संगमनेर येथे लग्नाचा दिवसही ठरला. साखरपुडा, सोने, मंगल कार्यालय, आचारी इसार, कपडे यासाठी १४ लाख ८० हजार रुपये खर्च केला. मुलगा नवऱ्या मुलीशी संपर्क करत नाही, त्यामुळे शंका निर्माण झाली. खातरजमा केली असता सदर मुलाचे लग्न अगोदरच झाल्याचे कळाले. त्यानंतर मुलीच्या आईने अकोले पोलिसांत तक्रार दिली.

अकोले पोलिसांनी मुलगा निखिल प्रकाश हासे यास ताब्यात घेतले आहे. तर प्रकाश दत्तात्रय हासे, अनिता प्रकाश हासे, व इतर चार जण फरार आहेत.

# जयंती निमित्त भीमज्योत तरुण मंडळातर्फे विविध उपक्रमाचे आयोजन

राजगुरुनगर : (स. गांवकरी)



भव्य दिव्य मिरवणुकीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती राजगुरुनगर येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. येथील भीमज्योत तरुण मंडळाने आयोजित केलेल्या जयंती निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन केले होते. जयंती निमित्त तीन दिवस चाललेल्या उपक्रम अंतर्गत आरोग्य शिबिर,अन्नदान, वक्तृत्व स्पर्धा,होम मिनिस्टर,भीम गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. जयंती दिनी सकाळी मानवंदना घेऊन येथील एस. टी.स्टँड समोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृती शिल्पास भीमज्योत तरुण मंडळातर्फे पुष्पहार अर्पण करून अभिवादन कार्यक्रम घेण्यात आले.तसेच सकाळी नऊ वाजता लोकप्रतिनिधी, प्रांताधिकारी, तहसीलदार तलाठी,विविध संस्थेचे पदाधिकारी सामाजिक, राजकीय शैक्षणिक क्षेत्रातील पदाधिकारी कर्मचारी व नागरिकांनी डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी खेड चे आमदार बाबाजी काळे यांनी अभिवादन प्रसंगी मनोगत व्यक्त करताना सांगितले की भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व घटकासाठी न्याय देण्याचे काम केले. त्यांचे विचार सर्वासाठी प्रेरणादायी असून सर्वांनी अंगीकृत करणे गरजेचे आहे.या स्मृती स्थळी बाबासाहेब यांचा भव्य असा पूर्णाकृती पुतळा उभा करण्यास पूर्ण सहकार्य करू .

संध्याकाळी भीमज्योत तरुण मंडळाच्या वतीने शहरातून भव्य दिव्य अशी मिरवणूक काढण्यात आली.आकर्षक विद्युत रोषणाईने हत्तीच्या प्रतिकृतीवरून विराजमान डॉ.बाबासाहेब यांचा पुतळा नागरिकांचे लक्ष वेधून घेत होता.त्याबरोबर मिरवणुकीत घोडे, डी.जे,ढोल लेझीम च्या पथकाबरोबर हजारो तरुण,तरुणी ,महिला मुले या मिरवणुकीत सहभागी झाले होते.येथील डॉ. आंबेडकर पुतळ्या पासून निघालेली मिरवणूक शहरातून फिरून रात्री उशिरा सांगता झाली.या दरम्यान नगरपरिषदेचे नगराध्यक्ष ,नगरसेवक,नगरसेविका,विविध जाती धर्माचे नागरिक,तसेच राजकीय ,सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी ठिकठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास हार घालून अभिवादन केले.शांतता पूर्ण वातावरणात झालेल्या मिरवणुकीचे आयोजन भीमज्योत तरुण मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष,सचिव व सर्व सभासदानी केले होते.

# नाशिक भूषण पुरस्कार श्री पियुष सोमाणी यांना जाहीर

## डॉ. राजेंद्र नेहेते व विलास शिरोरे यांचा 'रोटरी भूषण' ने होणार सन्मान

(स. गांवकरी)




रोटरी क्लब ऑफ नासिक तर्फे देण्यात येणारा यंदाचा नाशिक भूषण 2025 -26 पुरस्कार उद्योग आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पियुष सोमाणी यांना जाहीर झाला आहे. तर रोटरी भूषण पुरस्कार नाशिक येथील सुप्रसिद्ध प्लास्टिक सर्जन रोटे. डॉ. राजेंद्र नेहेते व कळवण येथील सुप्रसिद्ध व्यावसायिक रोटे. विलास शिरोरे यांना घोषित करण्यात आले आहेत. शुक्रवार दिनांक 17 एप्रिल 2026 रोजी संध्याकाळी सहा वाजता प्रख्यात आयटी तज्ज्ञ व लेखक डॉ. उदय निगुडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत सदरचे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. नाशिक ही ज्यांची जन्मभूमी अथवा कर्मभूमी आहे आणि ज्यांनी स्वतःच्या कर्तुत्वाने स्वतःबरोबर नाशिकचे नाव उज्ज्वल केले आहे अशा व्यक्तींना 'नाशिक भूषण' पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्याची संकल्पना 1996- 97 पासून रोटरी क्लब ऑफ नासिक राबवित आहे. आत्तापर्यंत कुसुमाग्रज, वसंत कानेटकर, डॉ.वसंतराव गुप्ते, विनायकराव पाटील, शांताबाई दाणी,डॉ. वसंत पवार, बापू नाडकर्णी व कुसुमताई पटवर्धन आदींना सदरचा पुरस्कार देण्यात आलेला आहे. यंदाचे नाशिक भूषण पियुष सोमाणी यांची नाशिक ही कर्मभूमी असून उद्योग व सामाजिक क्षेत्रात त्यांचे अतुलनीय कार्य आहे. ते सुप्रसिद्ध उद्योगपती-(इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी) असून ते इ एस डी एस सॉफ्टवेअर सोल्युशन लि चे संस्थापक व सीईओ आहेत.

पुरस्कार प्रदान सोहळ्यास सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन रोटरी क्लब ऑफ नासिकचे अध्यक्ष डॉ.गौरव सामनेरकर,सेक्रेटरी सी ए रेखा पटवर्धन,प्रकल्प सचिव मकरंद चिंधडे पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष सीए उदयराज पटवर्धन व जनसंपर्क संचालक एडवोकेट विद्युल्लता तातेड यांनी केले आहे.

# कापड व्यापाऱ्याची फसवणूक; नगरमधील चौघांवर गुन्हा

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

कपड्यांच्या व्यवसायात असलेल्या पुणे येथील एका व्यापाऱ्याची तब्बल ४५ लाख रूपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. अमोल दत्तात्रय येमुल (वय- ४४, रा. टिळक रस्ता, अवंती रेसिडेन्सेस, पुणे) असे फसवणूक झालेल्या व्यापाऱ्याचे नाव आहे. त्यांनी सोमवारी (१३ एप्रिल) तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार त्यांच्या आत्याचा मुलगा प्रशांत राजाराम बल्लाळ (रा. बालिकाश्रम रस्ता), राजेंद्र कराळे (पूर्ण नाव, पत्ता माहिती नाही), आदित्य रमेश परदेशी (पत्ता माहिती नाही), रमेश परदेशी (पूर्ण नाव, पत्ता माहिती नाही) यांच्याविरूध्द हा गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी अमोल येमुल हे पेशवाई श्रीमंत या नावाने कपड्यांचा व्यवसाय करत असून पुण्यासह अहिल्यानगर येथे त्यांच्या दुकानाच्या शाखा आहेत. सर्जेपुरा (अहिल्यानगर) येथील शाखा त्यांनी १३ ऑक्टोबर २०१९ रोजी सुरू केली होती. सदर शाखेच्या कामकाजासाठी त्यांनी त्यांच्या आत्याच्या मुलगा प्रशांत बल्लाळ याची मुख्य व्यवस्थापक म्हणून नियुक्ती केली होती. तसेच राजेंद्र कराळे याला विभागीय व्यवस्थापक, आदित्य परदेशी व त्याचे वडील रमेश परदेशी यांना बिलिंग विभागात नेमले होते. येमुल यांच्या म्हणण्यानुसार, दुकानातील सर्व व्यवहारांचे ऑनलाइन रेकॉर्ड पुण्यातील मुख्य सर्व्हरशी जोडलेले होते. दरवर्षी ३१ मार्च रोजी स्टॉक तपासणी केली जात असली, तरी करोना काळात (२०२० व २०२१) ती होऊ शकली नाही. त्यानंतर २०२२ व २०२३ मधील स्टॉक तपासणीत मोठ्या प्रमाणात तफावत आढळून आली. विशेषतः २०२३ मध्ये सुमारे तीन हजार ६०० नग माल कमी असल्याचे निदर्शनास आले.

# मराठी उद्योजकाचा अमेरिकेच्या हार्वर्डमध्ये झेंडा

## 'तौराल इंडिया' व भरत गीते यांची यशोगाथा हार्वर्ड बिझनेस स्कुलच्या अभ्यासक्रमात

पुणे : (स. गांवकरी)




अॅल्युमिनियम सँड कास्टिंग क्षेत्रातील आघाडीची कंपनी तौराल इंडिया आणि उद्योगांना ग्रामीण भारताशी जोडू पाहणारे उद्योजक, 'अॅल्युमिनियम मॅन ऑफ इंडिया' अशी ओळख असलेले भरत गीते यांची यशोगाथा जगातील प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थांपैकी एक असलेल्या अमेरिकेतील हार्वर्ड बिझनेस स्कूलच्या केस स्टडीमधून मांडण्यात आली आहे. या माध्यमातून तौराल इंडिया जागतिक स्तरावर अभ्यासल्या जाणाऱ्या निवडक कंपन्यांच्या यादीत स्थान मिळवणारी कंपनी ठरली आहे. ही केस स्टडी तौरल इंडियाचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी भरत गीते यांच्या नेतृत्वाखाली उभारलेल्या उच्च-प्रिसिजन अॅल्युमिनियम कास्टिंग व्यवसायाच्या प्रवासावर आधारित आहे. जर्मनीस्थित थोनी आलुटेक या कंपनीसोबतच्या संयुक्त उपक्रमातून २०१६ साली सुरू झालेल्या या प्रवासाचा मागोवा या अभ्यासात घेण्यात आला आहे. ऊर्जा, रेल्वे, संरक्षण आणि एरोस्पेस यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांना सेवा देणाऱ्या जागतिक स्तरावरील उत्पादन व्यासपीठापर्यंत झालेल्या कंपनीच्या प्रगतीचा यात समावेश आहे. हार्वर्ड बिझनेस स्कुल येथील वरिष्ठ प्राध्यापक व्ही. जी. नारायणन यांनी ही केस स्टडी तयार केली असून, मुंबईतील हॉटेल ताज लँड्स एन्ड येथे मंगळवारी त्यांनी या केस स्टडीचे सादरीकरण केले. भरत गीते व माजी उद्योगमंत्री सुभाष देसाई यांच्यासह उद्योग, शिक्षण व धोरणात्मक क्षेत्रातील मान्यवर यावेळी उपस्थित होते. परंपरागत औद्योगिक पार्श्वभूमी किंवा नेटवर्क नसतानाही पहिल्या पिढीतील उद्योजक जागतिक स्तरावरील उद्योग कसा उभारू शकतात, याबाबतचे विश्लेषण प्रा. व्ही. जी. नारायणन यांनी यामधून मांडले आहे.

प्रा. व्ही. जी. नारायणन म्हणाले, "तौरल इंडियाचा प्रवास उदयोन्मुख बाजारपेठेत उत्पादन क्षमता उभारण्यासाठी आवश्यक असलेल्या घटकांवर केंद्रित आहे. जागतिक सहकार्य, उच्च तंत्रज्ञान आणि स्थानिक अंमलबजावणी यांच्या संगमातून सक्षम व जागतिक स्तरावर स्पर्धात्मक उद्योग कसा उभा राहू शकतो, याचे हे उदाहरण आहे. 'तौराल इंडिया'चा प्रवास केवळ उद्योगक्षेत्रापुरता मर्यादित न राहता, नव्या पिढीतील उद्योजकांसाठी प्रेरणादायी ठरेल. त्यातूनही एखादा तरुण उद्योजक झाला, तर या केस स्टडीचा उद्देश साध्य झाल्याचे समाधान मिळेल." भरत गीते म्हणाले, "हार्वर्ड बिझनेस स्कूलमध्ये केस स्टडी म्हणून निवड होणे, हा आमच्यासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे. आमचा प्रवास मूलभूत तत्त्वांवर आधारित असून, मर्यादांवर मात करत भारतीय उत्पादन जागतिक दर्जाचे बनू शकते, हे सिद्ध करण्याचा आहे. योग्य दृष्टिकोन, शिस्त आणि भागीदारीच्या आधारे भारतासाठी आणि जगासाठी उच्च-गुणवत्तेचे, प्रिसिजन-आधारित अभियांत्रिकी उपाय आणि टिकाऊ उत्पादन मूल्य निर्माण करता येते, हा आमचा विश्वास अधिक दृढ झाला आहे." २०१६ मध्ये स्थापना झालेली तौराल इंडिया आज चाकण (पुणे) आणि सुपा (अहिल्यानगर) या दोन उत्पादन प्रकल्पांसह अॅल्युमिनियम कास्टिंग उत्पादक म्हणून विकसित झाली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### डॉ बाबासाहेब आंबेटकर जयंती निमित्त पक्ष्यांसाठी खिर्डी परिसरात ट्रे वाटप

रावेर (स. गांवकरी) : खिर्डी ता रावेर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त येथील सामाजिक संस्था तत्पर फाउंडेशनच्या वतीने अत्यंत संवेदनशील आणि स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला. वाढत्या उन्हाची तीव्रता आणि पक्ष्यांची होणारी पाण्यासाठीची वणवण लक्षात घेऊन, संस्थेच्या वतीने परिसरात विविध ठिकाणी पक्ष्यांसाठी पिण्याच्या पाण्याचे ट्रे,चे वाटप करण्यात आले. डॉ. बाबासाहेबांच्या जयंतीचे औचित्य साधून केवळ उत्सव न साजरा करता, मुक्या जिवांप्रती दाखवलेल्या या माणुसकीच्या उपक्रमाचे संपूर्ण परिसरातून मोठे कौतुक होत आहे. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष कांतिलाल गाढे, उपाध्यक्ष प्रदीप महाराज पंजाबी, सचिव शेख इद्रीस, गुणवंत पाटील .प्रवीण धुंदले, चंद्रकांत कोळी, गुणवंत पाटील ,संकेत पाटील, अंकित पाटील, सतीश फेगडे, रितेश चौधरी, सादिक पिंजारी, भिमराव कोचुरे यांसह अनेक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सामाजिक बांधिलकी जपत राबवलेला हा उपक्रम पर्यावरणाच् या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाचा मानला जात असून, या उपक्रमामुळे पक्ष्यांना हक्काचा पाणवठा उपलब्ध होणार आहे.




### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त भव्य मोफत आरोग्य शिबिर

रावेर (स. गांवकरी) : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त निरुळ येथे भव्य मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी जपत आरोग्य सेवेचा अनोखा संदेश देण्यात आला. या शिबिराचे आयोजन प्रदीप दिनकर खैरे यांनी केले होते. बाबासाहेबांना मानवंदना म्हणून त्यांनी CBC, मधुमेह व थायरॉईड तपासणी मोफत उपलब्ध करून देत समाजासाठी प्रेरणादायी कार्य केले. ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्य समस्या लक्षात घेता अशा उपक्रमांची नितांत गरज असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. “लोकांची सेवा हीच खरी भीम जयंती” असा अर्थपूर्ण संदेशही त्यांनी दिला. कार्यक्रमाचे उद्घाटन प्राथमिक आरोग्य केंद्र, वाघोड येथील आरोग्य सहाय्यक श्री. चंपालाल महाजन यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आरोग्य केंद्रातील सर्व कर्मचारी उपस्थित होते. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी टेक्निशियन वैभव गाढे, अमोल सिंग आणि गजानन मशाने यांनी मोलाचे योगदान दिले. तसेच गावातील ग्रामपंचायत सदस्य व मान्यवर राजू भाऊ सवर्णे, दिलीपजी कांबळे, उमेश गाढे, महेश तायडे, रवींद्र रायपूरे, सुरेश अटकाळे, राहुल निंभोरे, राजेश अटकाळे यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. या आरोग्य शिबिराला गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

### 500 च्या उधारीवरून वाद — मित्राच्या लाकडी मारहाणीत एकाचा मृत्यू

डांग, गुजरात (स. गांवकरी) : प्राप्त माहितीनुसार, डांग जिल्हा येथील आहवा तालुक्यातील नीलशाक्या गावात किरकोळ उधारीच्या कारणावरून दोन मित्रांमध्ये झालेल्या भांडणात एकाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. नीलशाक्या गावातील रहिवासी अनिलभाई रमजुभाई पवार (वय अंदाजे 50 वर्षे) यांनी सुमारे दोन महिन्यांपूर्वी त्यांच्या मित्र जिग्नेश अशोकभाई पवार याला ₹500 उधार दिले होते. दिनांक 13/04/2026 रोजी रात्री अनिलभाईंनी आपले पैसे परत मागितल्यावर दोघांमध्ये वाद झाला. वाद वाढत गेल्याने आरोपी जिग्नेश पवार संतापून रात्री सुमारे 8 वाजता आपल्या घरातून लाकूड घेऊन आला आणि अनिलभाईंवर हल्ला केला. त्याने डोक्यावर जोरदार प्रहार केला तसेच छातीवरही मारहाण केली, ज्यामुळे अनिलभाईंना गंभीर दुखापत झाली. जखमी अवस्थेत त्यांना तात्काळ आहवा सिव्हिल हॉस्पिटल येथे उपचारासाठी नेण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी सुबीबेन पवार यांनी आहवा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पोलीस निरीक्षक जितेश बारिया यांनी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवून त्याला अटक केली असून पुढील तपास सुरू आहे.

### भरडधान्य खरेदीतील गोंधळानंतर नोंदणी प्रक्रिया रद्द

किनवट (स. गांवकरी) : रब्बी हंगामातील भरडधान्य खरेदी प्रक्रियेत निर्माण झालेल्या गोंधळाच्या पार्श्वभूमीवर आदिवासी विकास महामंडळाने महत्त्वाचा निर्णय घेतला असून १३ एप्रिल व त्यापूर्वी झालेली शेतकऱ्यांची नोंदणी प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे. आता नव्याने २० एप्रिलपासून नोंदणी सुरू करण्यात येणार असल्याची माहिती अधिकृतरित्या देण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या., नाशिक अंतर्गत उप प्रादेशिक कार्यालय, किनवट यांच्या वतीने तहसीलदार, किनवट यांना पाठवलेल्या पत्रानुसार, आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत रब्बी पणन हंगाम २०२५-२६ मध्ये धान व भरडधान्य (ज्वारी, मका) खरेदीसाठी १३ एप्रिलपासून नोंदणी सुरू करण्यात आली होती. मात्र, काही ठिकाणी ज्या शेतकऱ्यांच्या शेतात प्रत्यक्षात ज्वारी किंवा मका पिकवलेले नाही, अशांनीही नोंदणी केल्याच्या तक्रारी पुढे आल्या.

### पत्रकार रमेश ठाकुर यांना पुत्रशोक



नवीन नांदेड (स. गांवकरी) : नवीन नांदेड मराठी पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष रमेश ठाकुर यांचे चिंरजीव ओंकार रमेश ठाकुर यांचे अल्पशा आजाराने दि १५ एप्रिल रोजी निधन झाले असून निधन समयी त्यांचे वय २३ वर्षे होते त्यांच्या पश्चात आई-वडील ,दोन बहिनी ,भाचे असा परिवार आहे. गोदातीर समाचारचे वितरक तथा नवीन नांदेड मराठी पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष रमेश ठाकुर यांना दोन मुली जावई नातवंडे व एकुलता एक मुलगा ओंकार ठाकुर हे होते तर वयाच्या २३ या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. असून त्यांच्या पार्थिव देहावर दि १५ एप्रिल रोजी रात्री १० वाजता सिडको येथील वैकुंठ धाम स्मशानभुमित अंत्यसंस्कार करण्यात आले .

# ४० वर्षांनंतर जुने मित्र पुन्हा एकत्र

## अकोल्यातील १९८७ बॅचचा स्नेहमेळावा भावनिक वातावरणात संपन्न!

अकोले (अहिल्यानगर): (स. गांवकरी)

अकोले येथील कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या वाणिज्य शाखेच्या १९८७ बॅचचा तब्बल ४० वर्षांनंतर स्नेहमेळावा भंडारदरा परिसरातील “बाळा का व्हिलेज हॉटेल”, वाकी बंगला येथे मोठ्या उत्साहात पार पडला. जवळपास ३५ मित्र-मैत्रिणी या मेळाव्यास उपस्थित होते.



अकोले, मुंबई, पुणे, बारामती, सातारा, नाशिक आदी विविध ठिकाणांहून आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी अनेक वर्षांनी एकमेकांना भेटताच आनंदाचा क्षण अनुभवला. वयाच्या साठीनंतर शरीरयष्टीत झालेल्या बदलांमुळे अनेकजण एकमेकांना ओळखू शकत नव्हते, मात्र ओळख पटताच सर्वांनी एकमेकांना आत्मीयतेने भेटत जुन्या आठवणींना उजाळा दिला.

या स्नेहमेळाव्याच्या आयोजनात मैत्रिणींना एकत्र आणण्याचे महत्त्वाचे काम पुष्पा भोत यांनी केले, तर मित्रांना संघटित करण्याची जबाबदारी अनिल नवले व किरण सोनवणे यांनी पार पाडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजा पवार यांनी केले, तर संपूर्ण व्यवस्थापन विठ्ठल वाकचौरे यांनी उत्कृष्टरीत्या केले. हॉटेलचे मालक एकनाथ वैराळ यांचेही सर्वांनी आभार मानले. कार्यक्रमादरम्यान सर्वांनी आपल्या कॉलेज जीवनातील आठवणी, सुख-दुःख एकमेकांशी शेअर केले. काहींनी गाण्यांमधून वातावरण रंगतदार केले, तर उपस्थित कुटुंबीयांनीही सहभाग घेत आनंद लुटला. प्राची शेलार व ज्योत्स्ना वाकचौरे यांनीही कार्यक्रमात मोलाचे सहकार्य केले. तसेच राजूर विभागाचे पत्रकार शांताराम काळे यांची उपस्थितीही लक्षवेधी ठरली.

मेळाव्याच्या शेवटी निरोप घेताना वातावरण अत्यंत भावनिक झाले. विशेषतः दूरवरून आलेले महेंद्र शहा यांच्या डोळ्यांत दाटलेले अश्रू पाहून अनेकांचे मन भरून आले. काहींच्या डोळ्यांतूनही अश्रू वाहू लागले, ज्यातून या मैत्रीचे अतूट नाते अधोरेखित झाले. एकूणच, ४० वर्षांनंतर भेटलेल्या या मित्र-मैत्रिणींनी मैत्रीचा खरा “महावृक्ष” पुन्हा अनुभवत एक अविस्मरणीय आठवण जपली. सर्वांनी एकमेकांचे मनापासून आभार मानत हा स्नेहमेळावा आनंदात संपन्न केला.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

किनवट : (स. गांवकरी)

किनवट शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त किनवट नगर परिषदेत अभिवादनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी नगराध्यक्षा सुजाता येंड्रलवार यांच्या उपस्थितीत बाबासाहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास उपनगराध्यक्ष हसन लाला खान, युवा नेते करण येंड्रलवार, नगरसेवक प्रविण राठोड, चंद्रशेखर रंगराव नेम्मानिवार, श्रीराम नेम्मानिवार, अभय महाजन, गटनेते सुरज सातुरवार, नगरसेविका ललिता मुनेश्वर, अश्विनी जागर्लावार, धिरज नेम्मानिवार, प्रभू कोल्हे, निसार भाटी तसेच गंगाधर दोनपेल्लीवार आदी पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. दरम्यान, शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे सामाजिक कार्यकर्ते मारोती मुनेश्वर व नगरसेविका ललिता मुनेश्वर यांच्या पुढाकाराने १०० किलो लाडूंचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाला नगराध्यक्षा सुजाता येंड्रलवार, रा.कॉ नेत्या बेबीताई नाईक व युवा नेते करण येंड्रलवार यांची प्रमुख उपस्थिती लाभली. जेतवन बुद्ध विहारात नगराध्यक्षा सुजाता येंड्रलवार यांच्या हस्ते पंचशील ध्वजवंदन करण्यात आले. मोठ्या संख्येने नागरिकांनी या उपक्रमात सहभागी होत लाडूंचा स्वाद घेतला. या दोन्ही कार्यक्रमांमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना अभिवादन करत सामाजिक एकात्मता व बंधुभावाचा संदेश देण्यात आला.



## हिमायतनगरात पाणीटंचाईचा तीव्र कहर

### नागरिकांची पाण्यासाठी भटकंती, १९ कोटींची योजना अद्याप कागदावरच!

हिमायतनगर : (स. गांवकरी)

एप्रिल महिन्यात वाढत्या उन्हाच्या तडाख्यामुळे हिमायतनगर शहरात भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून नागरिकांना अक्षरशः हंडाभर पाण्यासाठी वणवण भटकंती करावी लागत आहे. नगरपंचायतीकडून नळाला पाणी येणार असल्याची दिलेली आश्वासने मात्र केवळ पोकळ ठरत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. तालुक्यातील तलाव, बंधारे आणि जलसाठे आटल्याने परिस्थिती अधिकच गंभीर झाली आहे. नदी-नाले कोरडे पडले असून भूगर्भातील पाणी पातळीही झपाट्याने खालावत आहे. परिणामी शहरातील वार्ड क्रमांक ४, ५, ६, ७, ८. ११, १२ व १७ मधील नागरिकांना रात्री-अपरात्री पाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे. अनेक ठिकाणी महिलांना बोअरवेलजवळ तासन्तास रांगेत उभे राहून पाण्याची प्रतीक्षा करावी लागत आहे. दरम्यान,



शहरासाठी मंजूर असलेली तब्बल १९ कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजना अद्याप प्रत्यक्षात उतरलेली नसून केवळ कागदोपत्रीच असल्याचे वास्तव समोर आले आहे. बोरगडी रोडवरील पाण्याच्या टाकीत पाणी येऊनही ते नागरिकांच्या नळापर्यंत पोहोचत नसल्याने प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण केले जात आहे. पैनगंगा नदीवर आधारित पाणीपुरवठा योजनेचाही बोजवारा उडाल्याचे चित्र असून, नवनिर्वाचित नगरसेवक व नगराध्यक्षांनी केलेला गाजावाजा फोल ठरल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगत आहे. काही भागात पाणी विक्रीचे प्रकार सुरू असून नागरिकांना मोठ्या किमतीत पाणी विकत घ्यावे लागत आहे. यामुळे गोरगरीब कुटुंबांच्या आर्थिक स्थितीवर मोठा परिणाम होत आहे. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर विवाह सोहळे, धार्मिक कार्यक्रमांसाठीही पाण्याची टंचाई भासत असल्याने नागरिकांची चिंता अधिकच वाढली आहे. शहरातील सुजाण नागरिकांनी नगरपंचायत प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करून नळयोजनेची जोडणी पूर्ण करावी व प्रत्येक घरापर्यंत पाणी पोहोचवावे, अशी जोरदार मागणी केली आहे. “आश्वासन नव्हे, प्रत्यक्ष पाणी द्या!” अशी संतप्त प्रतिक्रिया आता हिमायतनगरकरांकडून उमटू लागली आहे.

## कलमविहीर जागेवर भाजपाची बिनविरोध विजय

### कॉँग्रेस उमेदवाराने शेवटच्या दिवशी अर्ज मागे घेतल्याने भाजपाला फायदा

डांग, गुजरात : (स. गांवकरी)

राज्याच्या शेवटच्या टोकाला असलेल्या डांग जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमुळे राजकीय वातावरण तापले आहे. डांग जिल्हा पंचायतच्या एकूण १८ जागा आणि तालुका पंचायतच्या ४८ जागांपैकी एका जागेवर बिनविरोध निवड झाली असून उर्वरित ४७ जागांवर भाजप आणि कॉँग्रेस यांच्यात थेट लढत होत आहे.



आज उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस असल्याने जिल्हा पंचायत भवनात मोठी राजकीय हालचाल दिसून आली. यावेळी आहवा तालुका पंचायतमधील कलमविहीर जागेवर नाट्यमय घडामोडी घडल्या. या जागेसाठी भाजपकडून सुनीताबेन राजेशभाई गावीत आणि कॉँग्रेसकडून हिनाबेन संतोषभाई चौधरी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता.मात्र शेवटच्या दिवशी कॉँग्रेसच्या उमेदवार हिनाबेन चौधरी यांनी आपला अर्ज मागे घेतल्याने राजकीय चर्चांना उधाण आले. या पार्श्वभूमीवर भाजप उमेदवार सुनीताबेन गावीत बिनविरोध निवडून आल्या असून भाजप कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. डांग जिल्हा भाजप अध्यक्ष किशोरभाई गावीत, संघटन प्रभारी राजेशभाई देसाई आणि आमदार विजयभाई पटेल यांच्या नेतृत्वाखाली भाजपाला ही जागा बिनविरोध मिळण्यात यश आल्याचे मानले जात आहे.अर्ज मागे घेण्याच्या प्रक्रियेदरम्यान जिल्हा पंचायत भवनात भाजप आणि कॉँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उच्चस्तरीय तणाव निर्माण झाला होता. पोलिस आणि प्रशासनाने परिस्थिती नियंत्रणात आणली. डांग जिल्ह्यातील या निवडणुकीत उर्वरित जागांवर भाजप आणि कॉँग्रेस यांच्यात जोरदार लढत होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## जयंतीनिमित्त निबंध स्पर्धा

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

नांदेड भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्यावतीने राज्यभरात निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांमध्ये विचारप्रवर्तक लेखनाची आवड निर्माण करणे तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार करणे हा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले.

भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्वांसाठी आपले आयुष्य समर्पित करून समाजाला दिशा देण्याचे कार्य केले आहे. त्यांचे कार्य केवळ एका निबंधात मांडणे शक्य नाही. त्यामुळे आंबेडकर यांनी महिलांविषयी केलेले कार्य महिला सक्षमीकरणात त्यांनी दिलेले योगदान या विषयावर ही निबंध स्पर्धा होणार आहे. स्पर्धेचे स्वरूप या स्पर्धेत पहिल्या गटात

- विजेत्यांना पारितोषिक तर भाग घेणाऱ्या स्पर्धकांनाही मिळणार प्रशस्तीपत्र

शासकीय आयटीआय, खाजगी आयटीआय तसेच आयटीआय उत्तीर्ण झालेले विद्यार्थी यात सहभागी होऊ शकतात. तर विषयासाठी विद्यार्थ्यांना ५०० ते ८०० शब्दांची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. दुसरा खुला गट असून यात राज्यातील सर्व महिला आणि पुरुष सहभागी होऊ शकतात या गटाला ८०० ते १२०० शब्दांची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. दोन्ही गटाला निबंध केवळ मराठी भाषेत सादर करावा लागणार आहे. स्पर्धेचा कालावधी १४ ते २० एप्रिल हा निश्चित करण्यात आला आहे. स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणारे स्पर्धक 9152230193 या मोबाईल क्रमांकाशी संपर्क करू शकतात. त्याचबरोबर या स्पर्धेच्या नोंदणीसाठी क्यूआरकोडही देण्यात आला आहे.

## बीपीसीएल फाउंडेशनकडून शिर्डीत सौरऊर्जा प्रकल्प सुरू

### 1.7 मेगावॅट प्रकल्पामुळे ऊर्जा खर्चात बचत होणार

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (बीपीसीएल), ही फॉर्च्युन ग्लोबल 500 यादीतील कंपनी आणि महारत्न सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, आपल्या सीएसआर विभाग बीपीसीएल फाउंडेशनच्या माध्यमातून, श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट (SSST), शिर्डी यांच्यासोबत भागीदारी करून, श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट च्या इमारतींवर 1.7 मेगावॅट क्षमतेची ग्रिड-जोडलेली रूफटॉप सौर पीव्ही वीज निर्मिती प्रणाली उभारण्याचे काम हाती घेतले आहे. यामुळे शाश्वत ऊर्जा आणि समुदाय विकासाबाबतची त्यांची बांधिलकी अधिक दृढ झाली आहे.



या उपक्रमांतर्गत, बीपीसीएल फाउंडेशन ही अंमलबजावणी संस्था ) म्हणून कार्य करेल, तर एसएसएसटी, शिर्डी ही कार्यान्वयन संस्था म्हणून काम पाहणार आहे. या प्रकल्पासाठी एकूण 4,45,25,751 रुपये (जीएसटीसह) इतकी आर्थिक मदत देण्यात येणार असून, हा प्रकल्प १५ महिन्यांच्या आत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. या प्रकल्पातून स्व-उपभोग आणि नेट मीटरिंगद्वारे दरवर्षी सुमारे 26.9 लाख युनिट्स (kWh) वीज निर्मिती होण्याची अपेक्षा आहे. यामुळे दरवर्षी सुमारे रुपये 2.56 कोटींची लक्षणीय बचत होईल, तसेच कार्बन फूटप्रिंट कमी करण्यास आणि ऊर्जा कार्यक्षमता वाढविण्यासही मदत होईल. या उपक्रमाचा लाभ शिर्डी येथील एसएसएसटीमध्ये अनुदानित निवास सुविधांचा लाभ घेणाऱ्या 10 लाखांहून अधिक भक्तांना होणार आहे. बीपीसीएल फाउंडेशन आणि एसएसएसटी, शिर्डी यांच्यात औपचारिक सामंजस्य करार (MoU) मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला. यामध्ये मा. खासदार भाऊसाहेब वाकचौरे तसेच एसएसएसटीचे वरिष्ठ अधिकारी सीईओ गोरक्ष गाडीलकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी भीमराव दराडे, कार्यकारी अभियंता भिकन दाभाडे, मुख्य लेखाधिकारी मंगला वराडे, प्रशासकीय अधिकारी संदीपकुमार भोसले आणि उपकार्यकारी अभियंता (विद्युत) किशोर गवळी यांचा समावेश होता. सामंजस्य करारावर (MoU) सुश्री बीना मानसुख, महाव्यवस्थापक (प्रशासन सेवा, सुविधा व सीएसआर ), कॉर्पोरेट कार्यालय तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, बीपीसीएल फाउंडेशन, आणि श्री गोरक्ष गाडीलकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी यांनी स्वाक्षऱ्या केल्या. या प्रसंगी बीपीसीएल आणि बीपीसीएल फाउंडेशनचे सिनियर ऑफिसियल्स देखील उपस्थित होते. यामध्ये श्री देवेंद्र जोशी, जीएम (ॲडमिन सर्व्हिसेस) तसेच सीएसआरची ॲडिशनल चार्ज; श्री राजेश टिके, डीजीएम फायनान्स (सीएसआर); श्री संजय यादव, डीजीएम (सीएसआर); श्री मुकेश मुनेश्वर, असिस्टंट एक्झिक्युटिव (सीएसआर) व सेक्रेटरी, बीपीसीएल फाउंडेशन; श्री एन. मेघनाथन, डिप्टी जनरल मॅनेजर (एचआरएस); श्री अभिजीत चव्हाण, स्टेट हेड (रिटेल), महाराष्ट्र; श्री महेश एम, टेरीटरी मॅनेजर (एलपीजी), नाशिक; श्री राजकुमार मिश्रा, मॅनेजर सेल्स (एलपीजी), अहमदनगर; श्री मनोज जाधव, टेरीटरी मॅनेजर, अहमदनगर; तसेच श्रीमती हर्षा बिदावटका, सेल्स ऑफिसर, शिर्डी यांचा समावेश होता.

# 'विद्यानिकेतन'च्या शैक्षणिक शिरपेचात मानाचा तुरा

## एमबीए आणि एमसीए प्रथम वर्ष प्रथम सत्र 2026 परीक्षा निकालात विद्यार्थ्यांचे उत्तुंग यश







**बोटा : (स. गांवकरी)**

संगमनेर तालुक्यातील उच्च शिक्षणाला नवी दिशा देणाऱ्या विद्यानिकेतन ग्लोबल इन्स्टिट्यूट संचलित, विद्यानिकेतन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन महाविद्यालयाने आपल्या स्थापनेच्या पहिल्याच वर्षात यशाची उज्ज्वल परंपरा प्रस्थापित केली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने नुकत्याच जाहीर केलेल्या एमबीए आणि एमसीए ऑक्टोबर/नोव्हेंबर 2025-26 हिवाळी सत्राच्या परीक्षेत महाविद्यालयाने घवघवीत यश संपादन करून गुणवत्तेचा नवा आदर्श निर्माण केला आहे. या निकालाबाबत माहिती देताना महाविद्यालयाचे डायरेक्टर डॉ. संतोष पवार यांनी सांगितले की, "महाविद्यालय याच वर्षी कार्यान्वित झाले असून पहिल्याच बॅचच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश संस्थेच्या गुणवत्तेचे प्रतीक आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे व्यवस्थापन आणि तंत्रज्ञान विषयक शिक्षण देण्याचे आमचे उद्दिष्ट यशस्वी होताना दिसत आहे." यशस्वी विद्यार्थ्यांची नावे खालीलप्रमाणे व्यवस्थापन विभाग (एमबीए): या विभागातून फलकेस्वप्निल भाऊसाहेब याने ८.१९ CGPA मिळवून महाविद्यालयात प्रथम येण्याचा मान मिळवला. पाटील मयूर मानसराम (८.१५ CGPA) याने द्वितीय, तर कळमकर तेजस पांडुरंग, कुलट प्रताप संदीप व लामखेडे स्नेहल जयराम या विद्यार्थ्यांनी ८.१२ CGPA सह तृतीय क्रमांक संपादन केला. संगणक शास्त्र विभाग (एमसीए): एमसीए विभागात कु. पुंडे अश्विनी रमेश हिने ८.६२ CGPA मिळवून प्रथम क्रमांक संपादन केला. कु. खोकराळे ईशा मच्छिंद्र (८.३८ CGPA) हिने द्वितीय, तर कु. रासकर समृद्धी ईश्वर (८.१९ CGPA) हिने तृतीय क्रमांक मिळविला. मार्गदर्शकांची जोड: विद्यार्थ्यांच्या या नेत्रदीपक यशासाठी एमबीए विभागप्रमुख प्रा. संतोष गोर्डे, परीक्षा प्रमुख प्रा. विवेक घंगाळे, प्रा. सागर बेलकर, तसेच एमसीए विभागप्रमुख प्रा. आरती काशीद, प्रा. तृप्ती गाजरे व प्रा. अंकिता जाधव आणि कार्यालयीन प्रमुख श्री. गणेश देशमुख यांच्यासह सर्व प्राध्यापक वृंदाचे मोलाचे शैक्षणिक मार्गदर्शन लाभले. संस्थेच्या CEO डॉ. विद्युलता पाटील मॅडम, सचिव श्री. रामदास पोखरकर सर, कॅम्पस डायरेक्टर श्री. दिपक रहाणे सर, अभियांत्रिकी चे प्राचार्य डॉ. फटांगरे प्रशांत सर, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किरण शिंदे सर, इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्य सुनीता मॅडम व आय टी आय चे प्राचार्य प्रा. अभंग सर यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन करून त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. पहिल्याच वर्षीच्या या निकालामुळे बोटा व संगमनेर परिसरात विद्यानिकेतन महाविद्यालयाचे विशेष कौतुक होत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### राजीव गांधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे पोलीस भरतीत यश

मुदखेड (स. गांवकरी) : राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड येथील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र पोलीस भरतीत उल्लेखनीय यश संपादन करत महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. महाविद्यालयातील विद्यार्थिनी शिवानी माधवराव गाढे (रा. दरेगाव, ता. मुदखेड) यांची पहिल्याच प्रयत्नात नांदेड जिल्ह्यातून महाराष्ट्र पोलीस दलात निवड झाली तसेच महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी गोविंद अशोक मुंगल रा. ईजळी, ता. मुदखेड याची चंद्रपूर जिल्ह्यातून महाराष्ट्र पोलीस भरतीत निवड झाली आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार राजीव गांधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी डॉ. राजू कोंडेकर, डॉ. मयूर दरबेसवार, डॉ. ऋषिकेश मुंगल यांची प्रमुख उपस्थिती होती. महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या यशाचे कौतुक केले. या यशस्वी विद्यार्थ्यांकडून प्रेरणा घेऊन इतर विद्यार्थ्यांनीही आपल्या ध्येयपूर्तीसाठी कठोर परिश्रम करून यश मिळवावे, असा संदेश यावेळी देण्यात आला. राजीव गांधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सातत्याने विविध क्षेत्रात यश संपादन करून श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी नांदेडचे नाव उज्ज्वल केले असून, या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### १८ तास ग्रंथ वाचन करून डॉ. आंबेडकर जयंती साजरी

तामसा (स. गांवकरी) : हदगाव तालुक्यातील विविध ठिकाणी 18 तास ग्रंथ वाचन करून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त अभिवादन करण्यात आलं. ल्याहरी येथील ज्ञानवर्धिनी हायस्कूल येथे इयत्ता 8वी, 9वी च्या विद्यार्थ्यांनी 18तास ग्रंथ वाचन करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त अभिवादन केलं शाळेचे मुख्याध्यापक नागोराव जाधव यांनी आपल्या प्रस्ताविक भाषणात बाबासाहेबांच्या जीवन चरित्रावर भाष्य केले. तसेच तामशा येथील विद्यासागर मुलींचे हायस्कूल येथे विद्यार्थ्यांनी 18 तास वाचन पठण करून आदरांजली वाहिली या कार्यक्रमात सर्वप्रथम डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पूजन करून वाचण्याची सुरुवात करण्यात आली यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका उज्वला चिंचगावकर, शिक्षक दयानंद चव्हाण, हळदे, शंकर कोठुळे, दुगाळे, राणे,शिक्षिका पदमवार, सोनुळे लिपिक बालाजी वानखेडे सह शाळेचे शिक्षक उपस्थित होते.

### पोलिस हवालदाराला ३५ हजारांची लाच घेताना रंगेहाथ पकडले

अहमदनगर (स. गांवकरी) : लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने टोफखाना पोलीस स्टेशनमधील पोलिस हवालदार अनिल गोसावी यांना ३५ हजार रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडल्याची कारवाई आज (दि. १५ एप्रिल २०२६) करण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार व त्यांच्या कुटुंबीयांविरुद्ध टोफखाना पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यात मदत करण्याच्या बहाण्याने तसेच पोलीस स्टेशनला वारंवार येण्याचा त्रास टाळण्यासाठी आरोपी हवालदाराने सुरुवातीला ५० हजार रुपयांची मागणी केली होती. तडजोडीनंतर ३५ हजार रुपयांवर सौदा ठरवण्यात आला. याबाबत तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर येथे तक्रार दाखल केली. त्यानुसार सापळा रचण्यात आला. आज टोफखाना पोलीस स्टेशन परिसरात आरोपी अनिल गोसावी यांनी तक्रारदाराकडून ३५ हजार रुपयांची लाच स्वीकारताच पथकाने त्यांना रंगेहाथ पकडले. ही कारवाई पोलिस उपअधीक्षक अजित त्रिपुटे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पुढील तपास पोलिस निरीक्षक राजू आहेर करत आहेत. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, शासकीय कामासाठी कोणीही लाच मागितल्यास तात्काळ संबंधित विभागाशी संपर्क साधावा.

### नृत्य स्पर्धेत कुमारी नुपूर अनिल बाजाईत प्रथम पुरस्काराची मानकरी





नागपूर (स. गांवकरी) : नोवा स्टेलर आंतर महाविद्यालयीन स्पर्धा एस एफ कॉलेज सेमिनरी हिल नागपूर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.नागपुर मधील नामांकित कॉलेजच्या प्रतिस्पर्धीनी या स्पर्धेमध्ये मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता.कुमारी नुपूर अनिल बजाईत ही एस एफ कॉलेजमध्ये आर्ट विभागात प्रथम वर्षा त शिक्षण घेत आहे, यापूर्वी सुद्धा कु.नुपूर बजाईत हीने हैद्राबाद राष्ट्रीय नृत्य स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविला होता.काल झालेल्या स्पर्धेत उत्कृष्ट नृत्य सादर करून आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला पाहणाऱ्या प्रेक्षकांची तथा पंचांची मने जिंकली. कॉलेजमध्ये प्रथम पटकावल्यामूळे सगळीकडून कौतुकाचा वर्षाव होत आहे.तिच्या यशामागे तिचे कठिण परीश्रम आहे असे तिचे वडील श्री अनिल बजाईत तथा आई सौ वैशाली बजाईत यांनी सांगितले.वाडीतील श्री मोतीराम शहारे,श्री रोशन वैद्य,श्री उमेश साहु,दिपक अवचट अनिल दहाघाणे,श्री अविनाश टाके,श्री रामेश्वर वाडीमस्मे,प्रीती चौधरी,देवा क्षिरसागर , संजय जिवनकर यांनी कु.नुपूर अनिल बजाईत हिचे कौतुक केले असुन तिचे महाराष्ट्र भर नातेवाईक आनंद वक्त करत आहे.

### कॉग्निझंटकडून टेक्नोव्हर्स हॅकॅथॉन 2026ची घोषणा

बंगळुरू (स. गांवकरी) : कॉग्निझंटने (नॅसडॅक: CTSH) कॉग्निझंट टेक्नोव्हर्स हॅकाथॉन 2026ची घोषणा केली आहे. तिसऱ्या पर्वात प्रवेश करत असलेली ही स्पर्धा प्रादेशिक उपक्रमातून देशव्यापी व्यासपीठात रूपांतरित झाली असून, देशभरातील 400हून अधिक महाविद्यालयांमधील 20,000 पेक्षा जास्त प्री-फायनल वर्षातील अभियांत्रिकी विद्यार्थी यात सहभागी होणार आहेत. या माध्यमातून विद्यार्थी एकत्र येऊन सहयोग, नवकल्पना आणि एआय-आधारित समस्यांवर उपाय शोधण्याची आपली क्षमता सादर करतील. कॉग्निझंटच्या ग्लोबल ऑपरेशन्सचे प्रेसिडेंट तसेच कॉग्निझंट इंडिया चेअरमन आणि मॅनेजिंग डायरेक्टर राजेश वरियर म्हणाले, "उद्योगक्षेत्रासाठी हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा असून एआयच्या माध्यमातून घडणाऱ्या बदलांना गती देणारी पुढील पिढी तयार करण्यासाठी कॉग्निझंट कटिबद्ध आहे.

## रेडमी ए७ प्रो ५जी भारतात लॉंच; दमदार फीचर्स

**पुणे : (स. गांवकरी)**



शाओमी इंडियाने आपल्या रेडमी ए सिरीजमधील पहिला प्रो मॉडेल असलेला 'रेडमी ए७ प्रो ५जी' स्मार्टफोन अधिकृतपणे लॉंच केला आहे. परवडणाऱ्या किमतीत दमदार वैशिष्ट्ये देण्याचा दावा कंपनीने केला असून, दैनंदिन वापरासाठी सक्षम असा हा स्मार्टफोन ठरणार असल्याचे सांगितले आहे. या स्मार्टफोनमध्ये सेगमेंटमधील सर्वात मोठा ६.९ इंच (१७.५३ सेमी) डिस्प्ले देण्यात आला असून १२० हर्ट्झ रिफ्रेश रेटमुळे स्मूथ अनुभव मिळतो. ८०० निट्स पीक ब्राइटनेस आणि वेट टच टेक्नॉलॉजीमुळे बाहेरील प्रकाशातही वापर सोपा होतो. तसेच, डोळ्यांच्या सुरक्षिततेसाठी टीयूव्ही प्रमाणपत्रासह डीसी डिमिंगची सुविधा देण्यात आली आहे. बॅटरीच्या बाबतीतही हा स्मार्टफोन आघाडीवर असून ६३०० mAh क्षमतेची मोठी बॅटरी देण्यात आली आहे. १५ वॅट चार्जिंग आणि ७.५ वॅट रिव्हर्स चार्जिंग सपोर्टमुळे दीर्घकाळ वापर शक्य होतो. विशेष म्हणजे इतकी मोठी बॅटरी असूनही फोन सडपातळ डिझाइनमध्ये सादर करण्यात आला आहे. परफॉर्मन्ससाठी ऑक्टा-कोर ५जी प्रोसेसर देण्यात आला असून व्हर्च्युअल रॅम सपोर्टमुळे मल्टिटास्किंग अधिक वेगवान होते. या फोनमध्ये नवीन हायपरओएस ३.० प्रणालीचा समावेश करण्यात आला आहे, ज्यामुळे वापर अधिक सुलभ आणि स्मार्ट होतो. फोटोग्राफीसाठी ३२ मेगापिक्सेल एआय ड्युअल रिअर कॅमेरा आणि ८ मेगापिक्सेल फ्रंट कॅमेरा देण्यात आला आहे.

## शेतकरी न्यायासाठी युवक कॉंग्रेसचा सत्याग्रह

**पुणे : (स. गांवकरी)**





भारत-अमेरिका कराराविरोधात महाराष्ट्र प्रदेश युवक कॉंग्रेसतर्फे करण्यात आलेल्या शेतकरी न्याय सत्याग्रहाला पुणे जिल्ह्यातील युवक कॉंग्रेस पदाधिकाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हा निर्णय भारतीय शेतकऱ्यांच्या अस्तित्वावर घाला असून, तो तात्काळ मागे घेतला गेला नाही, तर कॉंग्रेस पक्ष रस्त्यावर उतरून अधिक तीव्र आंदोलन छेडेल, असा इशारा कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी दिला. या सत्याग्रहाला माजी आमदार रामहरी रुपनवर व पुणे जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष लहू निवंगूने यांच्यासह महाराष्ट्र प्रदेश युवक कॉंग्रेसचे उपाध्यक्ष प्रथमेश आबनावे, वीरधवल गाडे, विश्वजीत जाधव, पुणे जिल्हा युवक कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष उमेश पवार, पिंपरी-चिंचवड युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष कौस्तुभ नवले, सौरभ अमराळे, यशवंत मोहोळ, वैभव यादव, अशोक घोलप, सौरभ रुपनवर, वैभव बुरंगुले, संकेत गवारी, राहुल जाधव, संदिप सातकर आदी पदाधिकाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. या आंदोलनाला शेतकरी, युवक व सर्वसामान्य नागरिकांचा वाढता पाठिंबा मिळत असून, आगामी काळात हा लढा अधिक व्यापक करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

उमेश पवार यांनी केंद्र सरकारच्या या तथाकथित किसान ट्रेड डीलवर तीव्र टीका केली. ते म्हणाले, "शेतकऱ्यांच्या न्यायासाठी कॉंग्रेसने नेहमीच पुढाकार घेतला आहे. केंद्र सरकारने घेतलेली धोरणे शेतकऱ्यांसाठी मारक आहेत. कर्जमाफी होत नाही. शेतीमालाला एमएसपीनुसार भाव मिळत नाही. परिणामी शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत. त्यामुळे पुणे ग्रामीण युवक कॉंग्रेसच्या माध्यमातून गावागावातून युवकांना एकत्र करून हा लढा अधिक बळकट करण्यात येईल. शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत संघर्ष सुरूच राहील. 'शेतकरी वाचवा, युवक वाचवा, भारत वाचवा' हा नारा जनमानसात पोहोचवण्याची गरज आहे."

## दिलजीत आणि जान्हवी सोबत 'हाफटाइम' मोहीम लॉंच

**पुणे : (स. गांवकरी)**




कोका-कोला इंडियाने 'हाफटाइम' या संकल्पनेवर आधारित नवी जाहिरात मोहीम लॉंच केली असून, यासाठी लोकप्रिय कलाकार दिलजीत दोसांझ आणि जान्हवी कपूर यांच्यासोबत सहयोग केला आहे. दैनंदिन धावपळीच्या जीवनात छोट्या विश्रांतीच्या क्षणांना अर्थपूर्ण बनवण्याचा संदेश या मोहिमेतून देण्यात आला आहे.

या मोहिमेचा गाभा असा आहे की, 'हाफटाइम' म्हणजे केवळ विश्रांती नव्हे, तर पुन्हा नव्या उर्जेने कामाला लागण्याचा क्षण आहे. कोका-कोलाच्या ताजेतवाने चवीद्वारे व्यक्तींना असा छोटा पण प्रभावी विरंगुळा मिळतो, जो त्यांना वर्तमानाशी जोडून ठेवतो आणि नात्यांना अधिक जवळ आणतो.

कोका-कोला इंडिया आणि साऊथवेस्ट एशियाचे मार्केटिंग सीनियर डायरेक्टर कार्तिक सुब्रमण्यम यांनी सांगितले की, आजच्या वेगवान जीवनशैलीत लोकांना अर्थपूर्ण विश्रांतीची गरज अधिक भासते. अशा वेळी 'हाफटाइम'सारखा छोटा ब्रेक व्यक्तींना नव्याने उत्साही बनवतो आणि त्यांच्या सभोवतालच्या महत्त्वाच्या गोष्टींकडे लक्ष केंद्रित करण्यास मदत करतो.

डब्ल्यूपीपी ओपन एक्सच्या सहकार्याने आणि व्हीएमएलद्वारे साकारलेल्या या मोहिमेत दैनंदिन जीवनातील त्या क्षणांचे चित्रण केले आहे, जेव्हा व्यक्ती शारीरिकरित्या उपस्थित असली तरी मानसिकरित्या दूर गेलेली असते. दिलजीत दोसांझ त्यांच्या तालमीमध्ये मग्न असताना किंवा जान्हवी कपूर मैत्रिणींसोबत असूनही विचारात हरवलेली दिसते—अशा प्रसंगांमध्ये कोका-कोला ताजेपणाचा अनुभव देत लक्ष पुन्हा वर्तमानाकडे वळवतो.

व्हीएमएलचे क्रिएटिव्ह डायरेक्टर्स नकुल शर्मा आणि तीर्थ घोष यांनी सांगितले की, ही मोहीम आधुनिक जीवनातील वास्तव मांडते, जिथे माणूस वर्तमानापासून दूर जातो. कोका-कोला हा केवळ पेय नसून स्वतःशी आणि सभोवतालच्या जगाशी पुन्हा जोडण्याचा एक साधा, उत्साहवर्धक क्षण आहे, असा संदेश यातून देण्यात आला आहे. ही मोहीम दिल्ली, पंजाब, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, तामिळनाडू आणि कर्नाटक या प्रमुख बाजारपेठांमध्ये राबवली जात असून, टेलिव्हिजन, डिजिटल आणि सोशल मीडियावर ती प्रदर्शित होत आहे. दिलजीत दोसांझची जाहिरात उत्तर भारतासह महाराष्ट्रात दाखवली जात आहे, तर जान्हवी कपूर तामिळ आणि कन्नड आवृत्त्यांमध्ये झळकत आहे. या मोहिमेला डॉन भट यांनी संगीतबद्ध केलेल्या साउंडट्रॅकची साथ असून, विवेक हरीहरन आणि आरिफा रिबेलो यांच्या आवाजामुळे जाहिरातीला वेगळी रेट्रो शैली प्राप्त झाली आहे. स्थानिक कथांमधून मांडलेली ही मोहीम प्रेक्षकांशी अधिक जवळीक निर्माण करत 'हाफटाइम'च्या साध्या पण प्रभावी संकल्पनेला अधोरेखित करते.

## पाणी काढताना विजेचा धक्का लागून युवकाचा मृत्यू

**लोहा : (स. गांवकरी)**



लोहा तालुक्यातील आडगाव येथे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने सुरू असलेल्या पुलाच्या कामादरम्यान दुर्दैवी घटना घडली. खोदलेल्या खड्ड्यात साचलेले पाणी मोटारीच्या सहाय्याने काढत असताना विजेचा धक्का बसून एका युवकाचा जागीच मृत्यू झाला आहे. ही घटना दि १४ एप्रिल रोजी दुपारी सुमारे तीन वाजण्याच्या सुमारास घडली. सदाशिव शंकर गाडेकर (वय ३३, रा. धावरी) असे मृत युवकाचे नाव असून तो संबंधित कामावर देखरेख करत होता. काम सुरू असताना खड्ड्यातील पाणी मोटारी द्वारे बाहेर काढण्याचे काम सुरू होते. यावेळी अचानक विजेचा प्रवाह आल्याने सदाशिव गाडेकर यांना तीव्र धक्का बसला आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच लोहा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. पुढील तपास पोलीसांकडून सुरू आहे. या घटनेमुळे कामाच्या ठिकाणी सुरक्षेच्या उपाययोजनांबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.मृत सदाशिव गाडेकर यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे. त्यांच्या आकस्मिक निधनामुळे धावरी गावावर शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. बातमी लिहीपर्यंत गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे पोलिसांच्या वतीने सांगण्यात आला आहे.

## टाटा मोटर्स : लखनौ प्लांटमधून १० लाखवे व्यावसायिक वाहन तयार

**लखनौ : (स. गांवकरी)**




टाटा मोटर्स लिमिटेडने आपल्या लखनौ येथील उत्पादन केंद्रातून १० लाखवे व्यावसायिक वाहन तयार करत महत्त्वपूर्ण ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. या निमित्ताने कंपनीच्या औद्योगिक उत्कृष्टता, कौशल्य विकास आणि शाश्वत विकासातील योगदानाचा गौरव करण्यात आला.

या ऐतिहासिक उत्पादनातील १० लाखवे वाहन हे शून्य-उत्सर्जन इलेक्ट्रिक बस असून, भविष्यातील स्वच्छ आणि स्मार्ट वाहतूक व्यवस्थेकडे कंपनीचा कल असल्याचे स्पष्ट होते. उत्तर प्रदेश सरकारचे २०७० पर्यंतचे 'नेट-झिरो' उद्दिष्ट आणि टाटा मोटर्सचे २०४५ पर्यंतचे लक्ष्य यामधील साम्यही यावेळी अधोरेखित झाले.

या कार्यक्रमाला उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, टाटा सन्सचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन, उपमुख्यमंत्री ब्रजेश पाठक, टाटा मोटर्सचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी गिरीश वाघ यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी यावेळी सांगितले की, "लखनौ प्लांटमधून १० लाख वाहनांचे उत्पादन हा राज्यासाठी अभिमानाचा क्षण आहे. उद्योग, कुशल मनुष्यबळ आणि सक्षम पायाभूत सुविधांमुळे उत्तर प्रदेश व्यवसाय विस्तारासाठी पोषक ठरत आहे."

१९९२ मध्ये स्थापन झालेला लखनौ प्लांट आज टाटा मोटर्सच्या सर्वात महत्त्वाच्या उत्पादन केंद्रांपैकी एक बनला आहे. जवळपास ६०० एकर परिसरात पसरलेला हा प्रकल्प ट्रक आणि बससह विविध प्रकारच्या व्यावसायिक वाहनांचे उत्पादन करतो. या प्लांटची वार्षिक उत्पादन क्षमता एक लाख वाहनांहून अधिक असून, येथे तयार होणारी वाहने देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय बाजारात निर्यात केली जातात.

या प्लांटमुळे ८,००० हून अधिक लोकांना रोजगार मिळत असून कौशल्य विकासासाठी विविध प्रशिक्षण उपक्रम राबवले जात आहेत. तसेच, हा प्लांट १०० टक्के नूतनीकरणक्षम ऊर्जेवर चालतो आणि 'वॉटर पॉझिटिव्ह' असल्याने पर्यावरण संरक्षणालाही चालना मिळत आहे.

टाटा सन्सचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन यांनी सांगितले की, "उत्तर प्रदेशसोबतच्या दीर्घकालीन भागीदारीमुळे उद्योग, सरकार आणि समाज एकत्र येऊन मोठ्या प्रमाणावर प्रगती साधता येते, याचे हे उत्तम उदाहरण आहे."

एकूणच, लखनौ प्लांटमधील हा टप्पा टाटा मोटर्सच्या शाश्वत, तांत्रिकदृष्ट्या प्रगत आणि लोककेंद्रित औद्योगिक विकासाच्या दिशेने असलेल्या वाटचालीचे प्रतीक ठरत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे




### फोक्सवॅगन इंडियातर्फे नवीन फोक्सवॅगन टायगुनची घोषणा

पुणे (स. गांवकरी) : फोक्सवॅगन इंडिया ने भारतीय बाजारात आपली नवी फोक्सवॅगन टायगुन गाडी सादर केली आहे. या गाडीची सुरुवातीची किंमत १०.९९ लाख रुपये (एक्स-शोरूम) ठेवण्यात आली आहे. या नव्या गाडीत सुमारे ४० बदल करण्यात आले असून ती ९ वेगवेगळ्या रंगांमध्ये उपलब्ध आहे. या गाडीत १.० लिटर क्षमतेचे पेट्रोल इंजिन आणि नवीन ८-गती स्वयंचलित गिअर व्यवस्था देण्यात आली आहे, ज्यामुळे गाडी चालवताना अधिक गुळगुळीत अनुभव मिळतो आणि इंधनाची बचतही होते. या गाडीच्या सादरीकरणासोबतच कंपनीने ग्राहकांसाठी एक खास योजना जाहीर केली आहे. या योजनेनुसार, गाडी खरेदी केल्यानंतर ३ वर्षे किंवा ३०,००० किलोमीटरपर्यंत वापरल्यानंतर ग्राहकांना गाडीच्या मूळ किमतीपैकी ७५ टक्के रक्कम परत मिळण्याची हमी दिली जाणार आहे (नियम व अटी लागू). त्यामुळे ग्राहकांना गाडी खरेदी करताना अधिक विश्वास मिळणार असून पुढे नवीन गाडी घेणेही सोपे होणार आहे. ही योजना ३१ मे २०२६ पर्यंत बुकिंग करणाऱ्यांसाठी लागू असेल. फोक्सवॅगन इंडियाचे अधिकारी श्री. नितीन कोहली म्हणाले की, "ही गाडी भारतातील त्यांच्या गाड्यांपैकी महत्त्वाची असून ग्राहकांना चांगला देखावा, सुरक्षितता, दमदार कामगिरी आणि आधुनिक सोयी यांचा एकत्रित अनुभव देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या गाडीत मोठा पडदा, आवाजावर चालणारी सुविधा, उघडता येणारे छत, तसेच सुरक्षिततेसाठी सहा हवेच्या पिशव्या (एअरबॅग) देण्यात आल्या आहेत." या गाडीची किंमत वेगवेगळ्या प्रकारांनुसार सुमारे १०.९९ लाख रुपयांपासून ते १९.२९ लाख रुपयांपर्यंत जाते. एकूणच, नवीन सोयी, चांगली कामगिरी आणि ग्राहकांसाठी दिलासा देणारी योजना यामुळे फोक्सवॅगन भारतीय बाजारात आपली पकड अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न करत आहे.

### एएमएसकडून पुणे जीसीसीचा विस्तार; भारत ठरतोय जागतिक टॅलेंट बॅकबोन

पुणे (स. गांवकरी) : जागतिक टॅलेंट ॲक्विझिशन आणि ऑर्केस्ट्रेशन सोल्यूशन्स क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी एएमएस (AMS) ने पुण्यातील आपल्या पहिल्या इंडिया-आधारित ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर (GCC) चा विस्तार जाहीर केला आहे. या विस्तारामुळे जागतिक पातळीवरील ऑपरेशन्समध्ये भारताची धोरणात्मक टॅलेंट बॅकबोन म्हणून असलेली भूमिका अधिक मजबूत झाली आहे. हा विस्तार एएमएसकडून ईएमईए (EMEA), एपीएसी (APAC), अमेरिका आणि यूके या आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमधील वाढत्या मागणीला प्रतिसाद म्हणून करण्यात येत आहे. कंपनी भारतातील आपल्या कार्यबलाचा विस्तार करत असून, जागतिक ग्राहकांना अधिक सक्षम आणि स्केलेबल सेवा देण्यावर भर देत आहे. भारत आज जगातील आघाडीचा जीसीसी हब म्हणून उदयास आला असून सध्या देशात १,७०० हून अधिक जीसीसी कार्यरत आहेत आणि २०३० पर्यंत ही संख्या सुमारे २,५०० पर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. केवळ खर्चिक फायद्यांपलीकडे जाऊन, संस्थांना भारतात विशेष कौशल्ये, डिजिटल क्षमता आणि स्केलेबल ग्लोबल सेवा मिळत असल्यामुळे भारताचे महत्त्व वाढत आहे. एएमएसचा पुण्यातील विस्तार हा या व्यापक प्रवाहाशी सुसंगत असून, कंपनीच्या जागतिक सेवा वितरण धोरणात भारताला केंद्रस्थानी ठेवतो.

### 'जाने अनजाने हम मिले'मधील कीर्तीच्या भूमिकेतील नाट्यमय बदल



पुणे (स. गांवकरी) : झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिका 'जाने अनजाने हम मिले' सध्या उत्कंठावर्धक वळणावर आली आहे. भरत अहलावत (राघव) आणि आयुषी खुराणा (रीत) यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या मालिकेत कीर्तीची भूमिका साकारणारी अभिनेत्री गौरी अगरवाल प्रेक्षकांचे विशेष लक्ष वेधून घेत आहे. कथानक जसजसे पुढे सरकत आहे, तसतसा कीर्तीचा सकारात्मक ते नकारात्मक असा प्रवास अधिक गडद होताना दिसत आहे. मालिकेत कीर्ती रीत आणि राघव यांना वेगळे करण्यासाठी कोणतीही मर्यादा ओलांडताना दिसते. राघववर खोटे आरोप करणे, रीतला इजा पोहोचवण्याचा प्रयत्न करणे, इतकेच नव्हे तर स्वतःलाही इजा करून घेण्यासारखे टोकाचे निर्णय ती घेत आहे. या बदलत्या व्यक्तिरेखेने प्रेक्षकांना खिळवून ठेवले असले तरी, या भूमिकेचा अभिनेत्री गौरी अगरवालवर वैयक्तिक पातळीवरही परिणाम झाला आहे. या संदर्भात गौरी म्हणते, "भूमिकेच्या मागणीनुसारच मला हे सगळं करावं लागत आहे, हे मी स्वतःला सतत समजावून सांगत होते. काही प्रसंग इतके तीव्र होते की माझ्या नैतिकतेलाच त्याचा विरोध वाटत होता. त्या भावनिक ओझ्यामुळे ते प्रसंग पूर्णपणे साकारताना मला खूप संघर्ष करावा लागला." ती पुढे सांगते, "एक कलाकार म्हणून मला व्यक्तिरेखेचा प्रवास प्रामाणिकपणे दाखवणं महत्त्वाचं होतं. मात्र, हे प्रसंग भावनिक आणि शारीरिकदृष्ट्याही खूपच आव्हानात्मक होते. प्रेक्षकांना ते विश्वासार्ह वाटावेत यासाठी मला विशेष काळजी घ्यावी लागली."

### ग्राहक अनुभवात सहानुभूतीचा अभाव

मुंबई (स. गांवकरी) : भारतातील ४८ टक्के ग्राहकांनी ग्राहक अनुभवात (सीएक्स) सहानुभूतीचा अभाव असल्याची तक्रार केली असताना, फक्त १९ टक्के व्यावसायिक प्रमुख एआयच्या मदतीने ही समस्या सोडवण्याचा प्रयत्न करत असल्याचे सर्विसनाऊच्या 'कस्टमर एक्सपिरियन्स रिपोर्ट २०२६'मधून समोर आले आहे. अहवालानुसार, कंपन्यांकडून एआयला मोठे प्राधान्य दिले जात असले तरी ग्राहकांच्या अपेक्षा आणि कंपन्यांच्या गुंतवणुकीत मोठी तफावत दिसून येत आहे. यामुळे ग्राहक अनुभव सुधारण्यात अडथळे निर्माण होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. भारतातील ६० टक्के व्यावसायिक प्रमुख पुढील तीन वर्षांत 'कनेक्टेड एंटरप्राइझ' मॉडेल स्वीकारण्याचा विचार करत आहेत. तसेच ८१ टक्के कंपन्या ग्राहकांचा डेटा एकत्रित करण्याच्या तयारीत असून ६९ टक्के कंपन्या ओम्नीचॅनेल सीआरएम सुधारण्याचे नियोजन करत आहेत. तरीही, प्रत्यक्ष अंमलबजावणीमध्ये मोठी दरी असल्याचे अहवालात स्पष्ट झाले आहे. सर्विसनाऊ इंडियाचे वरिष्ठ उपाध्यक्ष सुमित माथूर यांनी सांगितले की, "एआयबाबत कंपन्यांची महत्त्वाकांक्षा मोठी आहे, मात्र मजबूत आणि जोडलेल्या प्रणालीशिवाय ही महत्त्वाकांक्षा गुंतागुंतीत रूपांतरित होते." अनेक कंपन्यांमध्ये डेटा, प्रक्रिया आणि कर्मचारी यांच्यात समन्वयाचा अभाव असल्यामुळे एआयचा प्रभावी वापर होत नाही. भारतातील फक्त ३८% कंपन्यांनी डेटा एकत्रित केला असून, ३४% कंपन्या एआय एकत्रीकरणासाठी प्रयत्नशील आहेत. संथ किंवा अपुऱ्या सेवेमुळे ४४% ग्राहक स्पर्धकांकडे वळण्याची शक्यता व्यक्त करतात. तसेच ४५% व्यावसायिक प्रमुखांनी खराब अनुभवामुळे ग्राहक गमावल्याचे मान्य केले आहे.

# बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

बेल्हे : (स. गांवकरी)



समर्थ रूरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ शैक्षणिक संकुल,बेल्हे येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यानंतर उपस्थित मान्यवरांनी बाबासाहेबांच्या कार्याचा आढावा घेत त्यांना अभिवादन केले.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने "भारतीय संविधान आणि बाबासाहेब आंबेडकर" या विषयावर वल्लभ शेळके यांनी उपस्थितीतांना मार्गदर्शन केले.आपल्या भाषणात त्यांनी भारतीय संविधानाची निर्मिती प्रक्रिया,त्यातील मूलभूत अधिकार व कर्तव्ये,तसेच लोकशाही व्यवस्थेची वैशिष्ट्ये यांचा सखोल ऊहापोह केला. त्यांनी सांगितले की,बाबासाहेबांनी भारतीय समाजातील सर्व घटकांना समान न्याय मिळावा यासाठी आयुष्यभर संघर्ष केला आणि संविधानाच्या माध्यमातून देशाला एक मजबूत लोकशाही व्यवस्था दिली.ते पुढे म्हणाले की,आजच्या तरुणांनी संविधानातील मूल्ये केवळ अभ्यासापुरती मर्यादित न ठेवता ती आपल्या दैनंदिन जीवनातही अंगीकारली पाहिजेत. समता,बंधुता आणि स्वातंत्र्य ही मूल्ये प्रत्येकाच्या आचार-विचारांतून दिसली पाहिजेत,असे त्यांनी अधोरेखित केले.तसेच शिक्षणाचे महत्त्व,सामाजिक जबाबदारी आणि देशभक्तीची जाणीव याबाबतही त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित केले.

यानिमित्ताने समर्थ कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स महाविद्यालयांमध्ये बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनकार्य या विषयावर वक्तृत्व स्पर्धा व निबंध स्पर्धेचे आयोजनही करण्यात आले होते. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.भूषण दिघे प्रा.दिनेश जाधव प्रा.सोमनाथ गाडेकर व राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी सुंदर अशा संविधान मंदिराची निर्मिती केली व सामूहिक संविधानाचे वाचन करण्यात आले. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके,उपाध्यक्ष माऊली शेठ शेळके,सचिव विवेक शेळके,विश्वस्त वल्लभ शेळके,माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहलताई शेळके,कॅम्पस डायरेक्टर प्रा. राजीव सावंत,अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नवनाथ नरवडे,प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदीप गाडेकर समर्थ कॉम्प्युटर सायन्स महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.उत्तम शेलार,डॉ.लक्ष्मण घोलप,समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ.कुलदीप रामटेके समर्थ कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ.संतोष घुले,समर्थ पॉलीटेक्निकचे प्राचार्य डॉ.अनिल कपिले,प्रा. संजय कंधारे,आय टि आय चे उपप्राचार्य विष्णू मापारी,नर्सिंग महाविद्यालयच्या ऐश्वर्या गटकळ,विधी महाविद्यालयाचे प्रा.शिवाजी कुमकर,डॉ.शरद पारखे,क्रीडा संचालक हरिश्चंद्र नरसुडे पदाधिकारी,सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संविधानाबद्दल जागरूकता निर्माण झाली असून बाबासाहेबांच्या विचारांचे महत्त्व अधिक दृढ झाले.

## एआय स्पेशलिस्ट आणि कंटेंट क्रिएटर पदांना मोठी मागणी

पुणे : (स. गांवकरी)

रोजगार बाजारपेठेत प्रवेश करणाऱ्या पदवीधर तरुणांसाठी एआय स्पेशलिस्ट, जनरेटिव्ह एआय इंजिनिअर आणि डिजिटल कंटेंट क्रिएटर ही पदे सर्वात वेगाने वाढणारी करिअर पर्याय ठरत असल्याचे लिंक्डइनच्या 'ग्रॅड्स गाइड २०२६' अहवालातून समोर आले आहे. बदलत्या रोजगाराच्या स्वरूपाशी जुळवून घेण्यासाठी मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने हा अहवाल प्रसिद्ध करण्यात आला असून, यात भारतातील वेगाने वाढणारी पदे, उद्योग आणि नोकरीच्या संधींबाबत सविस्तर माहिती देण्यात आली आहे. अहवालानुसार, करिअरच्या सुरुवातीला असलेल्या तरुणांसाठी संधी केवळ तंत्रज्ञान क्षेत्रापुरत्या मर्यादित राहिलेल्या नाहीत. युटिलिटीज, शिक्षण, सरकारी प्रशासन, वाहतूक व लॉजिस्टिक आणि ऊर्जा तंत्रज्ञान यांसारख्या क्षेत्रांमध्येही मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होत आहे. तसेच मानवी संसाधन (एचआर), सल्लागार सेवा, माहिती तंत्रज्ञान, विपणन, प्रोग्राम व प्रोजेक्ट मॅनेजमेंट आणि व्यवसाय विकास या विभागांमध्ये प्रवेश-स्तरावरील नोकऱ्यांची मागणी वाढत असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. लिंक्डइन करिअर तज्ज्ञ आणि लिंक्डइन न्यूजच्या भारतातील वरिष्ठ व्यवस्थापकीय संपादक निरजिता बॅनर्जी यांनी सांगितले की, करिअरची सुरुवात करणाऱ्या तरुणांनी अपारंपरिक मार्ग स्वीकारण्यास तयार राहणे आवश्यक आहे. "योग्य संधी नेहमी अपेक्षित ठिकाणी मिळेलच असे नाही. ती एखाद्या वेगळ्या उद्योगात, नवीन शहरात किंवा अनोख्या भूमिकेत मिळू शकते. आजच्या गतिमान रोजगार बाजारपेठेत विविध कौशल्यांचा विकास करणे अत्यंत महत्त्वाचे आहे," असे त्या म्हणाल्या.

## सिग्निफाय खेळ ज्योती उपक्रमामुळे क्रीडेला नवे बळ

पुणे : (स. गांवकरी)



सिग्नीफाय जागतिक स्तरावरील अग्रगण्य लाइटिंग कंपनी, भारतातील गवतपातळीवरील क्रीडा विकासासाठी आपल्या प्रमुख सीएसआर उपक्रम सिग्निफाय खेळ ज्योतीद्वारे सातत्याने योगदान देत आहे. आंतरराष्ट्रीय क्रीडा विकास व शांतता दिनाच्या पार्श्वभूमीवर हा उपक्रम क्रीडेला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन म्हणून अधोरेखित करतो.भारतामधील क्रीडा पायाभूत सुविधा मजबूत करण्याच्या उद्देशाने कंपनीने हरियाण्यातील ग्रामीण भागातील चार कबड्डी आणि खो-खो केंद्रांमध्ये अत्याधुनिक, ऊर्जा-कार्यक्षम एलईडी स्पोर्ट्स लाइटिंग प्रणाली बसवली आहे. या उपक्रमामुळे स्थानिक क्रीडा परिसंस्थेला चालना मिळत असून खेळाडूंना सूर्यास्तानंतरही सुरक्षितपणे सराव व स्पर्धा करण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. प्रकाशयुक्त क्रीडांगणांमुळे प्रशिक्षणाचा कालावधी वाढतो, दृश्यमानता सुधारते आणि सुरक्षितता वाढते. यामुळे युवक, महिला आणि स्थानिक समुदायांचा सहभाग लक्षणीयरीत्या वाढला आहे. सुरक्षित आणि सर्वसमावेशक क्रीडा वातावरण निर्माण करून सिग्निफाय प्रवेशयोग्यता, प्रतिभा विकास आणि सामाजिक कल्याणाला चालना देत आहे. या संदर्भात निखिल गुप्ता, हेड ऑफ स्ट्रॅटेजी अँड मार्केटिंग, सिग्निफाय, ग्रेटर इंडिया म्हणाले, "क्रीडा समुदायांना एकत्र आणते आणि तरुणांना संधी देते. सिग्निफाय खेळ ज्योतीद्वारे आम्ही गवतपातळीवरील सुविधा सुधारून दीर्घकालीन सामाजिक परिणाम घडवण्याचा प्रयत्न करत आहोत." तसेच,जेएसडब्ल्यूचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिव्यांशु सिंह यांनी नमूद केले, "प्रकाशासारखा साधा हस्तक्षेप गवतपातळीवरील क्रीडेमध्ये मोठा बदल घडवू शकतो. हरियाण्यात प्रशिक्षणाचा कालावधी वाढल्याने खेळाडूंच्या कामगिरीवर सकारात्मक परिणाम होत आहे." या उपक्रमामुळे विशेषतः मुलींच्या सहभागात वाढ झाली असून एकूण नोंदणीमध्येही लक्षणीय वाढ दिसून आली आहे. या केंद्रांनी यापूर्वीही राष्ट्रीय आणि व्यावसायिक स्तरावरील खेळाडू घडवले आहेत, ज्यामुळे अशा पायाभूत सुविधांचे महत्त्व अधोरेखित होते. ही केंद्रे स्थानिक क्रीडा परिसंस्थेचा अभ्यास करून निवडण्यात आली असून प्रकल्पाची अंमलबजावणी प्रो स्पोर्ट डेव्हलपमेंटच्या सहकार्याने करण्यात आली. आजपर्यंत सिग्निफाय खेळ ज्योती उपक्रमांतर्गत देशभरातील २०० हून अधिक क्रीडा केंद्रांना प्रकाश देण्यात आला आहे, ज्यामुळे सर्वसमावेशक आणि शाश्वत क्रीडा विकासाला बळकटी मिळत आहे.सिग्निफाय खेळ ज्योती हरियाण्यातील गवताच्या पातळीवरील क्रीडेला उजाळा देत, पुढच्या पिढीतील खेळाडूंना सामर्थ्य देते.

# अवैध वीज वापर अखेर कधी थांबणार?




### टोरेंट पॉवरचे नागरिकांना आवाहन

अवैध वीज जोडण्या व नेटवर्कशी छेडछाड करणाऱ्यांना कोणतेही पाठबळ देऊ नका. नेटवर्क सफाई व देखभाल कामांमध्ये टोरेंट पॉवरच्या कर्मचाऱ्यांना पूर्ण सहकार्य करा.स्वतःच्या व कुटुंबीयांच्या सुरक्षिततेसाठी केवळ मीटरयुक्त व कायदेशीर वीज जोडणीच वापरण्याचे आवाहन करत आहे.

ठाणे : (स. गांवकरी)

दिवा-शिळ–मुंब्रा–कळवा परिसरातील अवैध वीज जोडण्या कायद्याचे उल्लंघनच नव्हे तर जनजीवनासाठी गंभीर धोका निर्माण झाला आहे. मार्च 2020 मध्ये महावितरणचे फ्रँचायझी म्हणून टोरेंट पॉवरने दिवा -शिळ –मुंब्रा–कलवा परिसरातील वीज वितरणाची जबाबदारी स्वीकारली. या भागातील वाढते तांत्रिक व वाणिज्यिक नुकसान कमी करणे तसेच नागरिकांना सुरक्षित, दर्जेदार आणि अखंड वीजपुरवठा उपलब्ध करून देणे हा या नियोजनामागील मुख्य उद्देश आहे.

गेल्या सहा वर्षांत टोरेंट पॉवरने वीज वितरण जाळ्याचे सुदृढीकरण, पायाभूत सुविधा सुधारणा, मीटरयुक्त व कायदेशीर वीज जोडण्या देणे तसेच वीज चोरी रोखण्यासाठी सातत्याने विविध मोहिमा राबवल्या आहेत. तरीही अत्यंत खेदजनक बाब म्हणजे काही परिसर व गृहनिर्माण संकुलांमध्ये आजही अवैध वीज वापर व नेटवर्कशी छेडछाड सुरूच आहे. देवरीपाडा, राशिद कंपाऊंड, जीवन बाग, अमृत नगर, अमीनाबाद आदी भागांमध्ये अवैध हुकिंग व नेटवर्क टॅम्परिंगमुळे वीज वाहिन्या कमकुवत होत आहेत. परिणामी वारंवार वीजपुरवठा खंडित होतोच, शिवाय शॉर्ट सर्किट, आग लागणे व अन्य विद्युत अपघातांचा गंभीर धोका निर्माण होतो. अशा दुर्घटनांमध्ये जीवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. महत्त्वाचे म्हणजे, अवैध वीज वापरणाऱ्यांचा फटका नियमितपणे बिल भरून कायदेशीर वीज वापरणाऱ्या प्रामाणिक ग्राहकांनाही बसतो. नेटवर्क देखभालीसाठी नागरिकांचे सहकार्य अत्यावश्यक वीजपुरवठा सुरक्षित व स्थिर राखण्यासाठी टोरेंट पॉवरकडून वेळोवेळी नेटवर्क सफाई, देखभाल व अवैध जोडण्या हटविण्याची कारवाई केली जाते.

मात्र काही ठिकाणी या कामांना विरोध केला जातो, त्यामुळे अत्यावश्यक सुधारणा व देखभाल कार्यात अडथळे निर्माण होतात. वेळेत नेटवर्क देखभाल न झाल्यास, येत्या भीषण उन्हाळ्यात दीर्घकाळ व वारंवार वीज खंडित होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत सर्वसामान्य नागरिक, ज्येष्ठ व्यक्ती व लहान मुलांना प्रचंड त्रास सहन करावा लागू शकतो.

## वनप्लसने सादर केला 'नॉर्ड ६': उत्कृष्ट पर्याय

भारत : (स. गांवकरी)




वनप्लस इंडियाने आपला नवा 'नॉर्ड ६' हा दूरध्वनी संच सादर केला असून, आधुनिक वापरकर्त्यांच्या दैनंदिन गरजा लक्षात घेऊन तो विशेषतः तयार करण्यात आला आहे. या श्रेणीमध्ये प्रथमच १६५ प्रतिक्षण चित्रफ्रेम वेगाने खेळांचा अनुभव देणारा हा संच अत्यंत गुळगुळीत दृश्य सादर करतो. यामध्ये ९००० मिलीअँपिअर-तास क्षमतेची सिलिकॉन-कार्बन बॅटरी देण्यात आली असून, ती अडीच दिवसांहून अधिक वापर टिकवून ठेवते. अत्याधुनिक 'स्नॅपड्रॅगन ८एस जनरेशन ४' प्रक्रियक, स्पर्श प्रतिसादासाठी स्वतंत्र सहाय्यक घटक, त्रिमितीय ध्वनी वृद्धी, सहा-अक्षीय गतीमापक आणि ३२० हर्ट्झ स्पर्श नमुना दर यांसारख्या वैशिष्ट्यांमुळे स्पर्धात्मक खेळांमध्ये वापरकर्त्याला लक्षणीय फायदा मिळतो. जोडणीसाठी विशेष 'जी२' वाय-फाय घटक आणि पुढील पिढीच्या पाचव्या पिढीतील दूरसंचार जाळ्याचा प्रगत आधार देण्यात आला आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित 'माइंड स्पेस' प्रणालीमुळे वैयक्तिकृत ज्ञानसंग्रह, भाषांतर, लेखन सहाय्य आणि दस्तऐवज स्कॅनिंगसारखी साधने उपलब्ध होतात. छायाचित्रणासाठी ५० मेगापिक्सेल क्षमतेचा सोनी मुख्य सेन्सर द्वि-अक्षीय प्रकाशीय प्रतिमा स्थिरीकरणासह देण्यात आला असून, ३२ मेगापिक्सेलचा समोरील कॅमेरा देखील समाविष्ट आहे, ज्यामुळे कमी प्रकाशातही स्पष्ट आणि तपशीलवार छायाचित्रे मिळतात.

# फुले-आंबेडकरांचा प्रगतशील विचार मनामनात रुजावा

### सतीश राऊत यांचे मत; पद्मा फाउंडेशनतर्फे आंबेडकर जयंतीनिमित्त सन्मान सोहळ्याचे आयोजन

पुणे : (स. गांवकरी)



"चांगल्या शिक्षणातून व संस्कारातून माणूस घडतो. जाती, धर्म व लिंगभेदाच्या भिंती बाजूला सारून सर्वांना शिक्षणाच्या समान संधी मिळाव्यात, यासाठी महात्मा ज्योतिराव फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कार्य उभारले. त्यांनी दिलेला प्रगतिशील विचार प्रत्येकाच्या मनात रुजवण्याची, त्यांच्या विचारांचा अंगीकारून त्या मार्गाने चालण्याची गरज आहे," असे मत अपर जिल्हाधिकारी सतीश राऊत यांनी व्यक्त केले. गावकुसाबाहेर साजरी होणारी आंबेडकर जयंती सर्वसमावेशक व मुख्य प्रवाहातही साजरी होतेय, याचे समाधान वाटत असल्याचे त्यांनी नमूद केले. पद्मा फाउंडेशनच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित 'गौरव कार्याचा... उगवत्या ताऱ्यांचा' या सन्मान सोहळ्यात सतीश राऊत बोलत होते. समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना यावेळी गौरविण्यात आले. शिक्षण, सामाजिक कार्य, पर्यावरण संवर्धन आणि आरोग्य या क्षेत्रांत योगदान देणाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. प्रसंगी डॉ. दत्ता कोहिनकर यांचे 'मनाची मशागत' या विषयावर व्याख्यान झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन, तसेच ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांना श्रद्धांजली वाहून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

सिंहगड रस्त्यावरील मॉंटेरोसा सोसायटीमध्ये आयोजित कार्यक्रमावेळी भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, पोलीस उपायुक्त संभाजी कदम, आर्थिक विकास महामंडळाचे उपाध्यक्ष सचिन ईटकर, केंद्रीय राखीव सुरक्षा दलाचे कमांडर कवींद्र कुमार, निरीक्षक रामदास यशवंते, उद्योजक तुषार गोसावी, सामाजिक कार्यकर्ते डॉ. मिलिंद भोई, पुणे महानगरपालिकेतील नाव समितीच्या अध्यक्षा पल्लवी जावळे, माजी उपमहापौर सरस्वती शेंडगे, नगरसेविका ज्योती गोसावी, नगरसेवक सुरज लोखंडे, पद्मा फाउंडेशनचे संस्थापक शशिकांत कांबळे, पुष्पा कांबळे आदी उपस्थित होते. सतीश राऊत म्हणाले, "महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकर यांनी दिलेल्या समतेच्या, शिक्षणाच्या आणि सामाजिक न्यायाच्या विचारांची आज अधिक गरज आहे. हा प्रगतशील विचार प्रत्येकाच्या मनामनात रुजवला पाहिजे. बालपणी जातीभेदाच्या विरोधात बंड करण्याची प्रेरणा मला याच विचारांनी दिली. आजही समाजात असलेली असमानता आणि अन्याय दूर करण्यासाठी हा विचार पुढे नेला पाहिजे. रंगावरून कोणत्याही माणसाची ओळख निर्माण होऊ नये."